

स्थापना : १९६४

६२

मासिक
# नवस्नेह

हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

वर्ष १२ वे : अंक ५
ऑगस्ट २०२६

किंमत : २० रु.




प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## कोल्हापूर चित्पावन संघाला समर्थभक्त श्री. मकरंदबुवा सुमंत रामदासी यांची भेट !



नुकतीच समर्थभक्त श्री. मकरंदबुवा सुमंत रामदासी यांनी कोल्हापूर चित्पावन संघाला भेट दिली आणि चित्पावन या विषयावर विवेचन केले. ब्राह्मण सभा करवीर, मंगलमधाम येथील 'रामकथा सप्ताह' साठी ते कोल्हापुरात आले होते. यावेळी संघाचे पदाधिकारी आणि हितचिंतक उपस्थित होते. संघाने त्यांचे मनोभावे आदरातिथ्य केले.

## कोल्हापूर चित्पावन संघाची 'मायसावली केअर सेंटर' ला मदत



कोल्हापूर येथील 'मायसावली केअर सेंटर' येथे अन्नदानासाठी कोल्हापूर चित्पावन संघाकडून मायसावली केअर सेंटरच्या व्यवस्थापकांकडे छोटीशी आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर, कार्यवाह श्री. केदार जोशी, संचालक श्री. किरण जोशी आणि श्री. संतोष साने उपस्थित होते.






## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष १२ वे : अंक ५ : ऑगस्ट २०२६**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ.मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**

२) **अनुसयाबाई काळे /५**
– वैदेही जोशी

३) **भारतरत्न सचिन तेंडुलकर/६**
– विकास मेहेंदळे

४) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /८**
– ओंकार गाडगीळ

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' /९**
– सौ. मंजुश्री गोखले

६) **ज्ञानसूर्याची सावली /१०**
– सौ. मंजुश्री गोखले

७) **प्लॅस्टिकचा भस्मासूर /१४**
– कमला हर्डीकर

८) **विविध सामाजिक सन्मान /१७**

९) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०






हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

नाही नाही म्हणता म्हणता लागला की हो कोसळायला! अर्थात अजून तो हवाच आहे म्हणा! पण आता निदान दिलासा तरी दिला, पावसानं हो ! आता पुरेसा पडू दे हीच त्याच्याकडे प्रार्थना ! मित्रांनो, पावसाचं आपण कौतुक करतोय तसाच या महिन्यात आपल्या संघातही कौतुक सोहळा आहे. तोही आपण अनुभवायचा आहे. कारण हा कौतुक सोहळाच आपल्या जीवनात उत्साहाचे, प्रेरणेचे अनंत रंग भरतो, जसं पावसाचं आहे.

**कोई रंग नही होता, बारीश के पानी मे**
**फिर भी रंग भर देती है, सुखी फिजा में**

खरं सांगते. पावसाळी सहलीला गेलात तर निसर्गाचं हे रंगवैभव डोळे भरून पहा. अहो, एका नुसत्या हिरव्या रंगाच्या सुद्धा किती छटा असतात तिथे ! एकदा खरंच त्या पहा, मग कळेल, हिरवा रंग समृद्धीचा का असतो ते !

**रंग धरेचा खुलून गेला, हिरवी वसनं ल्याला गं**
**हिरव्या पानी, हिरव्या राणी, हिरवा श्रावण आला गं...**

होय ! हा अंक हातात पडेपर्यंत हिरवा श्रावण आलाही असेल ! पावसाच्या शिडकाव्याला आसुसलेलं मन या श्रावणात कसं भारून जातं. संगणकीय चमत्कारांची, ए.आय. प्रतिमांची आपण प्रशंसा करतो. पण या निसर्गात असलेल्या आणि क्षणाक्षणाला होणाऱ्या चमत्कारांकडे आणि प्रतिमांकडे आपण दुर्लक्ष करतो. पटतंय ना?

आता अशाच काही सुंदर प्रतिमा आपल्या नवस्नेहमधून दिसणार आहेत. ते म्हणजे आपल्या नवस्नेह मधले विविध विषयांवरचे लेख. तेही जरूर वाचा हं ! शिवाय काहीतरी लिहिणार आहात ना तुम्ही नवस्नेहच्या दिवाळी अंकासाठी? नक्की लिहा. काहीतरी लिहा, पण काहीतरीच लिहू नक ! तुमच्या उत्तम लिखाणाची आम्हाला प्रतिक्षा आहे.

याच महिन्यात स्वातंत्र्यदिन सुद्धा आहे. ७९ वा स्वातंत्र्यदिन ! तोही आपण झोकात साजरा करणार आहोत. तेव्हा श्रावणात येणाऱ्या सगळ्या सणांच्या आणि ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या तुम्हा सर्वांना नवस्नेह परिवारातर्फे अनेक हार्दिक शुभेच्छा !

**श्रावण मासी हर्ष मानसी**
**हिरवळ दाटे चोहीकडे**
**क्षणांत येते सरसर शिरवे**
**क्षणांत फिरूनी ऊन पडे !**

असा श्रावण अनुभवायला नवस्नेहसाबेत तयार व्हा. धन्यवाद !


आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले**
मो. ८८०५३५५२००



**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया,**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**



**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**
**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# अनुसयाबाई काळे



भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, कारण त्यामुळे केवळ राष्ट्रवादी चळवळच मजबूत झाली नाही, तर सामाजिक रूढींनाही नव्याने आकार मिळाला. त्यांच्या सक्रिय सहभागाने अडथळे दूर केले, विविध समुदायांना एकत्र आणले आणि समानता व सक्षमीकरणाच्या व्यापक लढ्यात योगदान दिले....

महिलांनी सक्रियपणे आंदोलनांमध्ये भाग घेतला, भव्य रॅली आयोजित केल्या, आंदोलनाचा संदेश पसरवला, अटक आणि तुरुंगवास सहन केला, आणि त्यांच्या संघटनांनी ठराव मंजूर केले, या सर्वांमधून ब्रिटिश राजवट संपुष्टात आणण्याची आणि स्वातंत्र्य मिळवण्याची त्यांची अढळ वचनबद्धता दिसून आली....

राष्ट्रीय चळवळीतील महिलांच्या सहभागाने एक महत्त्वपूर्ण बदल घडवला, कारण त्यांचे संयम, चिकाटी आणि नैतिक धैर्य हे गुण स्वातंत्र्यलढ्याचा अविभाज्य भाग बनले. महात्मा गांधींनी या सामर्थ्यांची दखल घेतली आणि महिलांना सत्याग्रह मोहिमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले, ज्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महिलांची भूमिका अधिक प्रभावी झाली....

अशाच अत्यंत प्रभावीपणे व नेतृत्व करणाऱ्या महिलांपैकी एक होत्या अनुसया काळे!!

अनुसयाबाईंचा जन्म २४ ऑक्टोबर १८९६ रोजी बेळगाव येथे झाला. बाळकृष्ण आणि गंगूबाई यांच्या त्या कन्या. त्यांचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत झाले. भागवत धर्माचे त्यांच्यावर मोठे संस्कार होते. १९१६ मध्ये इंजिनियर असलेल्या पुरुषोत्तम काळे यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. दलित समाजाबरोबर सहभोजन केल्यामुळे त्यांच्यावर समाजानेच बहिष्कार टाकला पण दोघेही पती पत्नी प्रगतशील विचारांचे पुरस्कर्ते असल्यामुळे या बहिष्काराला त्यांनी समर्थपणे तोंड दिले आणि पुन्हा सामाजिक कार्यामध्ये त्यांनी हिरिरीने भाग घेण्यास सुरवात केली. अनुसयाबाई आदिवासी मुलांची शाळा चालवत असत. भागवत धर्माचे विश्लेषणही त्या उच्च पातळीवरून करीत असत. त्यांच्या विचारांनी, भाषणांनी अनेक महिला प्रभावित झाल्या आणि त्यांना भगिनी मंडळाचे सदस्यत्वही दिले गेले. पण अनुसयाबाईंनी आदिवासी मुलांच्या शाळेत शिकविण्याचे काम मात्र सोडले नाही. त्यांची बुध्दिमत्ता व सामाजिक कार्यात सहभागी होण्याची व ते काम निष्ठापूर्वक करणेची पध्दत ब्रिटीश शासनदरबारी मान्य झाली आणि १९२७-१९२८ या कालखंडात त्यावेळच्या मध्यप्रदेशाच्या लेजिस्लेटिव असेंब्लीवर सभासद म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच व्हिटले कमिशन व इंटरनॅशनल लेबर ऑरगनायझेशन या संस्थावर देखील त्यांची नियुक्ती झाली होती. सरकार दरबारी त्यांना मानाची स्थाने मिळत असतानाही त्या प्रतिष्ठेचा लोभ त्यांना कधीच वाटला नाही. दोघेही पती पत्नी राष्ट्रीय भावनेने पूर्णतः भारून गेले होते. आपल्या देशासाठी कर्तव्य म्हणून आपण काही केले पाहिजे याबाबत पती पत्नीमध्ये नेहमी चर्चा होत असे. शेवटी दोघांपैकी एकाने

**पान १७ वर पहा...**

# 'भारतरत्न' सचिन तेंडूलकर



सचिन रमेश तेंडुलकर यांचा जन्म २४ एप्रिल १९७३ रोजी झाला. राजापूर येथे सारस्वत ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या सचिनचे नाव त्याचे वडील रमेश तेंडुलकर यांनी त्यांचे आवडते संगीतकार सचिन देव बर्मन यांच्या नावावरून ठेवले होते. सचिनचे वडील मराठी शाळेत शिक्षक होते. त्याचा मोठा भाऊ अजित तेंडुलकरने त्याला क्रिकेट खेळण्यासाठी प्रोत्साहित केले. सचिन तेंडुलकरचा भाऊ नितीन तेंडुलकर आणि बहीण सविता तेंडुलकर आहे. २४ मे १९९५ रोजी सचिनने डॉ. अंजली मेहताशी लग्न केले सचिन तेंडुलकर आणि अंजली यांना मोठी मुलगी सारा तेंडुलकर आणि मुलगा अर्जुन तेंडुलकर ही दोन मुले आहेत.

सचिनचे शिक्षण शारदाश्रम विद्यामंदिर येथे झाले. तिथेच त्यांनी प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात केली. वेगवान गोलंदाज होण्यासाठी त्यांनी एमआरएफ पेस फाउंडेशनच्या सराव कार्यक्रमात भाग घेतला पण तेथे वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक डेनिस लिली यांनी त्याला पूर्णपणे आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. ते क्रिकेटच्या इतिहासातील जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक मानले जातात . सचिन तेंडुलकर हे भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान , भारतरत्न मिळवणारे पहिले खेळाडू आणि सर्वात तरुण व्यक्ती आहेत. राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार मिळवणारे हे पहिले क्रिकेट खेळाडू आहेत. २००८ मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०१२ मध्ये त्यांना राज्यसभेचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आले होते.

१९८९ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर त्यानी फलंदाजीतही अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. त्यानी कसोटी आणि एकदिवसीय या दोन्ही क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावली आहेत.ते कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारे फलंदाज आहेत. यासह, कसोटी क्रिकेटमध्ये १४००० पेक्षा जास्त धावा करणारे जगातील एकमेव खेळाडू आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. वयाच्या १४ व्या वर्षी त्यानी मुंबईकडून पहिला प्रथम श्रेणी क्रिकेट सामना खेळला. १९८९ मध्ये कराची येथे पाकिस्तानविरुद्ध त्यांच्या आंतरराष्ट्रीय खेळाच्या कारकिर्दीला सुरुवात झाली.

२००१ मध्ये सचिन तेंडुलकर आपल्या २५९ डावांमध्ये १०,००० एकदिवसीय धावा पूर्ण करणारा पहिला फलंदाज ठरला. त्यानंतरच्या कारकिर्दीत, सचिन २०११ चा क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होता, २०१३ मध्ये, विस्डेन क्रिकेटर्सच्या पंचांगाच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त अखिल भारतीय कसोटी जागतिक इलेव्हनमध्ये समाविष्ट करण्यात आलेला तो एकमेव भारतीय क्रिकेटपटू होता. त्याची उंची लहान असूनही, लांब षटकार मारण्याच्या आणि चेंडूला योग्य दिशेने पाठविण्याच्या त्याच्या कलेमुळे, प्रेक्षकांनी त्याला लिटल मास्टर ही पदवी दिली, १९८८ मध्ये सचिनने हॅरिस शील्ड सामन्यादरम्यान सहकारी फलंदाज विनोद कांबळीसोबत ६६४ धावांची नाबाद भागीदारी केली होती. सचिन दरवर्षी

२०० मुलांची काळजी घेण्यासाठी **अपनालय** नावाची स्वयंसेवी संस्था देखील चालवतो.

तेंडुलकर हा नियमित गोलंदाज नाही, परंतु तो मध्यम वेगवान, लेग-स्पिन आणि ऑफ स्पिन गोलंदाज आहे. लांब आणि उशीरा फलंदाजांची जोडी तोडण्यासाठी त्याला बऱ्याचदा गोलंदाज म्हणून आणले जाते. भारताच्या विजयात त्याच्या गोलंदाजीचे अनेक वेळा मोठे योगदान राहिले आहे.

१६ फेब्रुवारी २०१२ रोजी मीरपूर येथे बांगलादेशविरुद्ध १०० वे शतक. एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे.वनडेमध्ये सर्वाधिक धावा (१८००० पेक्षा जास्त).वनडेतील सर्वोच्च ४९ शतके.एकदिवसीय विश्वचषकात सर्वाधिक धावा. कसोटी क्रिकेटमधील सर्वाधिक (५१) शतके, ५ नोव्हेंबर २००९ रोजी, ऑस्ट्रेलियाविरुद्ध १७५ धावांची खेळी करून एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७,००० धावा करणारा तो पहिला फलंदाज ठरला.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम. कसोटी क्रिकेटमध्ये १३००० धावा करणारा जगातील पहिला फलंदाज ठरला आहे.वनडेमध्ये सर्वाधिक मॅन ऑफ द सीरिज. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामनावीर. सचिनने परदेशी भूमीवर १४२ एक दिवसीय सामन्यांत ४६.१२ च्या सरासरीने ५७६६ धावा केल्या आणि १२७ कसोटी सामन्यांत ३५.४८ च्या सरासरीने ४१८७ धावा केल्या. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ३०,००० हून अधिक धावा आणि १०० शतके आहेत. २००३ च्या वर्ल्ड कपमध्ये सचिनने विक्रमी ६७३ धावा केल्या होत्या.

डिसेंबर २०१२ रोजी सचिनने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. पण त्याहूनही मोठा दिवस आला जेव्हा त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''देशाचे प्रतिनिधित्व करणे आणि संपूर्ण जगात खेळणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान होता. मी घरच्या मैदानावर माझा २००वा कसोटी सामना खेळण्यास उत्सुक आहे. त्यानंतर मी निवृत्त होणार आहे.'' त्याच्या इच्छेनुसार त्याचा शेवटचा कसोटी सामना वेस्ट इंडीजविरुद्ध मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळवला गेला. १६ नोव्हेंबर २०१३ रोजी मुंबईत झालेल्या या अखेरच्या कसोटी सामन्यात सचिनने ७४ धावा केल्या होत्या. सामन्याचा निकाल भारताच्या बाजूने येताच त्याने क्रिकेटवर विश्वास ठेवून निरोप घेतला. १६ नोव्हेंबर २०१३ रोजी, सचिन तेंडुलकरने मुंबईत क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर, भारत सरकारनेही त्यांना अधिकृतपणे देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न देण्याची घोषणा केली. ४ फेब्रुवारी २०१४ रोजी राष्ट्रपती भवनात झालेल्या एका समारंभात राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले. वयाच्या ४० व्या वर्षी हा सन्मान मिळवणारे ते सर्वात तरुण व्यक्ती आणि पहिला खेळाडू होते. यापूर्वी हा सन्मान क्रीडा क्षेत्रात दिला जात नव्हता. सचिनला हा सन्मान देण्यासाठी नियमांमध्ये बदल करण्यात आला होता. राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराने सन्मानित होणारे हे एकमेव क्रिकेटपटू आहेत. १९९४ मध्ये क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी भारत सरकारकडून अर्जुन पुरस्कार, भारताचा सर्वोच्च सन्मान, १९९९ मध्ये पद्मश्री हा भारताचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार, २००१ मध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्कार, महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च नागरी पुरस्कार,२००८ मध्ये पद्मविभूषण हा भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार, २०१४ मध्ये भारतरत्न, भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार २०१३ मध्ये भारतीय टपाल सेवेने सचिनचे टपाल तिकीट जारी केले, मदर तेरेसा यांच्यानंतर ज्यांच्या हयातीत असे टपाल तिकीट जारी करण्यात आले असे ते दुसरे भारतीय ठरले !

**– विकास मेहेंदळे,**
मोबा. ९४२०१५५११४

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक सात)**

मागील १९ दिवस सायकल वरून चाललेला प्रवास काही काळ थांबला होता. आता इथून पुढचा प्रवास श्री. प्रकाश यादव यांच्या वाहनातून सर्व कोल्हापूरच्या यात्रींबरोबर होणार असल्यामुळे प्रवासातील अनिश्चितता कमी झाली होती.

काल रात्रीच्या सुरक्षित आणि शांत झोपेनंतर आम्ही सर्वजण गंगोत्री येथे जाण्यासाठी सकाळी सात वाजता तयार झालो. वाटेत नाश्ता व दुपारचे जेवण हे हॉटेल मधूनच तयार करून घेतले होते. उत्तर काशी ते गंगोत्री हा प्रवास शंभर किलोमीटरचा आहे, पण हे अंतर पार करण्यासाठी चार तास लागतात. कारण संपूर्ण रस्ता वळणावळणाचा व पहाडामधून जाणारा असल्यामुळे वेळ लागतो. थोडे अंतर पार करून गेल्यानंतर धराली व हर्षित ही गावे लागतात. धराली गावाबाहेरच बीएसएफचा बेस कॅम्प आहे. मोसमातील नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे धराली हे गाव पूर्णपणे वाहून गेले होते व त्याच्या खाणाखुणा ठळकपणे दिसत होत्या. पर्यटकांसाठी असलेली छोटेखानी हॉटेल्स, लोकांची घरे वाहून गेली होती व त्यातील साहित्य अस्ताव्यस्त पसरलेले होते. हर्षित या गावात १९८५ साली आलेल्या राम तेरी गंगा मैली याचे शूटिंग झाले होते. तिथेच एका रम्य ठिकाणी थांबून आम्ही नाश्ता केला व पुढे निघालो. दुपारी साडेबारा वाजता आम्ही सर्वजण गंगोत्री येथे पोहोचलो. मंदिरापासून एक किलोमीटर अंतरावर गाडी लावली व दर्शनाला आलो. मंदिरापासून १८ किलोमीटरवर पहाडामध्ये गोमुख या ठिकाणी गंगा नदीचा उगम होतो. तिथे जाण्यासाठी सरकारी परवानगी व वाटाड्या घेऊन जावे लागते. गंगोत्री येथे गंगा नदीचे पात्र रुंद आहे व पाण्याचा प्रवाह वेगवान आहे. पाणी थंडगार असल्यामुळे पाण्यात हात घातला तर हात गारठतात. किनाऱ्यावर श्री भगीरथ तपोभूमी मंदिर व श्रीगंगा देवतेचे मंदिर आहे. मंदिराच्या सभोवताली उंच डोंगर आहेत.

दुपारी परतीच्या प्रवासात थांबून आम्ही सर्वांनी जेवण घेतले. ह्या ऋतूमध्ये रस्त्याच्या दुतर्फा सफरचंदाच्या बागा दिसत होत्या व विक्रीसाठी पण सफरचंद उपलब्ध होते. तिथेच एका बागेमध्ये गवत साठवणुकीची एक वेगळी पद्धत पाहायला मिळाली. आपल्याकडे गवताचे भारे बांधून एकावर एक रचून ठेवले जातात, पण त्या भागांमध्ये गवताच्या माळा तयार करून त्या झाडांवर टांगून ठेवल्या जातात किंवा अन्य सुरक्षित ठिकाणी ठेवल्या जातात. गवताच्या माळा बनवल्यामुळे कमी जागेत जास्त गवत राहते.

संध्याकाळी उत्तरकाशी जवळ असलेल्या हॉटेलमध्ये मुक्कामाला आलो. वाटेतच एके ठिकाणी मणेरी धरणाचे पाणी नदीपात्रात सोडले जाते. त्याचा वेग एवढा प्रचंड आहे की त्या पाण्याचे तुषार फार दूरवर उडतात व त्यामुळे पाऊस पडत असल्याचा भास होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी सामानाची बांधाबांध करून वाटेत खाण्यासाठी नाश्ता व जेवण बरोबर घेतले व सात वाजता केदारनाथकडे जाण्यासाठी निघालो. उत्तरकाशी नेताला ते केदारनाथ हा प्रवास पण मोठा आहे. वाटेत तिहरी-गडवाल येथे अतिप्रचंड असा आशियातील सर्वात मोठा रॉकफिल्डॅम लागतो. इथे भारतीय सैन्याचा पहारा आहे. त्यामुळे या भागात फोटो, रील काढण्यास सक्त मनाई आहे. तिथून पुढे आल्यानंतर मध्येच धरणाच्या बॅक वॉटरच्या बाजूला तयार करण्यात आलेल्या विसावा थांब्यावर थांबून नाश्ता केला. हे ठिकाण फार रमणीय होते. देवभूमी उत्तराखंडमध्ये पर्यटन हे

**पान १७ वर पहा...**

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

अध्याय १०

**विभूतियोग**

**श्रीभगवानुवाच ।**
**श्रीकृष्ण म्हणुनी अर्जुना । हें ऐक परम वचन ।**
**तूं सुखसंतोष होऊन । तें सांगेन तुझिया हितालागी ।।**
फिरूनि सांगतों ऐक वाक्य उत्तम मी तुज ।
राखसी श्रवणीं गोडी तुझें मी हित इचिछतों ।।१।।

**माझी उत्पत्ती नेणती सुरवर । आणि ऋषिही समग्र।**
**ते नेणती कां म्हणसी याचें उत्तर । यांची उत्पत्ति मजापासुनी ।।**
न देव जाणती माझा प्रभाव न महर्षि हि ।
सर्वथा मी चि देवांचे महर्षींचे हि मूळ की ।।२।।

**मी जाण उत्पत्तिरहित । लोक ईश्वर ऐसें म्हणत ।**
**ते मूर्ख नव्हे पापरहित । सत्य जाण अर्जुना ।।**
ओळखे जो अजन्मा मी स्वयं-भू विश्व-चालक ।
निर्मोह तो मनुष्यांत सुटला पातकांतुनी ।।३।।

**बुद्धि ज्ञान आणि मोह नाहीं । क्षमा सत्य दम शम पाहीं । सुख दु:ख उत्पत्ति नाश तोही । भय आणि अभय जाण ।।**
बुद्धि निर्मोहता ज्ञान सत्यता शम निग्रह ।
जन्म नाश सुखें दु:खें लाभालाभ भयाभय ।।४।।

**अहिंसा समता संतोष । तप दान यश अपयश ।**
**हे सर्व भाव उपजती जीवास । ते वेगळाले मज पासाव जाले**
तप दातृत्व संतोष अहिंसा समता क्षमा ।
माझ्या चि पासुनी भूतीं भाव हे वेगवेगळे ।।५।।

**महाऋषी आणि चारी मनु । हे जाले मजपासून ।**
**सृष्टि जाली याजपासून । म्हणोनि हे लोक माझिया प्रजा ।।**
महर्षि सात पूर्वींचे चौघे मनु तसे चि ते ।।
माझे संकल्पिले भाव ज्यांची लोकांत ही प्रजा ।।६।।

**ऐसा मजपासुनी विस्तार । मज तत्त्वतां जाणे जो नर। तो दृढ योग जाणे निर्धार । येथ नाहीं संशयो ।।**
हा योग-युक्त विस्तार माझा जो नीट ओळखे ।
त्यास निष्कंप तो योग लाभे ह्यांत न संशय ।।७।।

**मी सर्वांचे उत्पत्तिस्थान । प्रवर्तती सर्व मजपासून ।**
**ऐसें जाणोनि करिती माझें भजन । ज्ञानी भावयुक्त होउनी ।।**
सर्वांचे मूळ माझ्यांत प्रेरणा मजपासुनी ।
हे ओळखूनि भक्तीने जाणते भजती मज ।।८।।

**जो चित्त ज्ञानें मज नेमुनी । परस्परें कथा माझी करुनी । राहे संतोषरूप होउनी । ते पुरुष माझे ठायीं रमताती ।।**
चित्ते प्राणें जसे मी चि एकमेकांस बोधिती ।
भरूनि कीर्तने माझ्या ते आनंदांत खेळती ।।९।।

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक बेचाळिसावा)

१८

पंढरपुरात त्या दिवशी एक अभूतपूर्व सोहळा झाला. पंचक्रोशीतली सगळी संत मंडळी, भगवद्भक्त, वारकरी तिथं जमले होते. ज्ञानादादाची कीर्ती अवघ्या पंचक्रोशीत पसरली होती. त्याला पाहायला, त्याला ऐकायला, त्याला वंदन करायला, त्याचा आशीर्वाद मागायला, एकवार तरी त्याचा हात आपल्या मस्तकावर पडावा म्हणून अशी अनेकविध कारणांनी तिथं माणसं जमली होती; पण सगळ्यांचं अवधान ज्ञानादादावर केंद्रित झालं होतं. आता हेटाळणी कधीच संपली होती. उपेक्षा कधीची थांबली होती. तिरस्कार तर केव्हाच लोप पावला होता. आता सर्वत्र एकच नामघोष घुमत होता - 'ज्ञानेश्वर माउली, ज्ञानोबा माउली!'

ज्ञानादादाचे तेज, त्याचं ज्ञान, त्याचं लाघवी बोलणं, त्याचा विनम्र स्वभाव, दुसऱ्याला चटकन आपलंसं करणारी त्याची गोड भाषा, त्याची मुद्दा विस्तारानं समजावून सांगण्याची हातोटी, त्याचा आश्वासक स्पर्श, सगळं सगळं लोकांना आवडणारं, भावणारं! संमोहित झाल्याप्रमाणे लोक त्याच्याभोवती जमायचे. तो सांगेल ते करायचं, तो सांगेल तसं वागायचं. लोकशिक्षणाचा, समाज-शिक्षणाचा एक वेगळा आविष्कार बघायला मिळत होता. त्या दिवशी पंढरपुरातही तसंच झालं. भगवद्भक्ताचं आचरण सांगणारा भागवत धर्म अगदी पुरातन काळापासून अस्तित्वात असलेला. तर वारकरी परंपरेला भक्त पुंडलिकापासून उजाळा मिळालेला; पण तरीही वैदिक सनातन धर्माचं कर्मकांडाचं अतिक्रमण, यादव काळातलं सुखासीन आयुष्य आणि महानुभाव पंथांचा प्रचार, यामुळे आपला प्राचीन भागवत धर्म आणि वारकरी परंपरा झाकोळल्यासारखी झालेली; पण ज्ञानादादानं या दोन्हींची उत्तम सांगड घातली. भगवंताची भक्ती करतो तो 'भागवत' आणि वारी करतो तो 'वारकरी' एवढ्याच सीमित संज्ञेवर न थांबता भगवंताची भक्ती करणारा आणि त्यासाठी नेमानं वारी करणारा अशा दोघांना एकत्र आणून या दोन्हीतला गाभा, या दोन्हीतलं सारतत्त्व एकत्र आणून ज्ञानादादानं वारकऱ्यांचं, भगवद्भक्तांचं उद्बोधन केलं आणि सर्व धर्माच्या, सर्व जातींच्या, सर्व पंथांच्या, लोकांना सामावून घेणारा, आपलंसं करणारा, सर्वसमावेशक असा भागवत धर्म भक्तीच्या ध्वजपताकेखाली प्रतिस्थापित केला. लोकांना अतिशय आनंद झाला. इथं सगळे फक्त वारकरी होते.

भगवंताचे भक्त होते. हीच त्यांची जात होती. हाच त्यांचा धर्म होता. सगळेच भक्तीच्या एका समान पातळीवर होते. कुणी उच्च नव्हता, कुणी नीच नव्हता, कुणी ब्राह्मण नव्हता, कुणी अंत्यज नव्हता. या धर्मात अंधश्रद्धेला स्थान नव्हतं. डोळस श्रद्धा, हे याचं अधिष्ठान होतं. तत्त्वनिष्ठा ही याची आधारशीला होती. नामजप हे याचं साधन होतं. आत्मशुचिता हे याचं पालन होतं. विठ्ठलाची भक्ती ही याची मिरास होती. अखिल मानवजातीचं कल्याण हे याचं उद्दिष्ट आहे. शास्त्रानं निषिद्ध मानलेल्या वस्तूंचा प्रेमाने स्वीकार करून त्या वस्तूंना प्रतिष्ठा मिळवून देणारा हा धर्म. याने काशाचे टाळ भजनासाठी घेतले, कळकाची काठी ध्वजपताकेसाठी वापरली. भोपळ्याची वीणा झाली, चामड्याचे आच्छादन करून मृदुंग बनवला. कोळशाचा बुक्का कपाळी लावला. वैदिक सनातन धर्मानं नाकारलेल्या

भगवद्भक्तांना या धर्मानं प्रतिष्ठा मिळवून दिली, त्याचंच हे द्योतक होतं. ज्ञानादादाच्या बरोबर सोपानही या प्रतिस्थापनेच्या कार्यात सक्रिय झाला. आपल्या हातून केवढ्या मोठ्या प्रचंड कार्याचा पाया रचला जातोय, याची त्या दोघांनाही कल्पना नव्हती.

भागवत धर्म आणि वारकरी संप्रदाय यांची सुसंगतीनं सांगड घालून भागवत धर्माला नवं रूप देऊन झालं. अठरापगड जातींचे भगवद्भक्त या झेंड्याखाली जमले. एका नव्या युगाची ही नांदी होती. एका क्रांतीच्या पर्वाची सुरुवात होती. एका मानवीय युगाचा आरंभ होता. सगळे भगवद्भक्त आनंदानं न्हाऊन निघाले. त्यांच्या भक्तीला एक नवीन अर्थ मिळाला होता. श्रद्धेला पाठबळ लाभलं होतं. विश्वासाला आधार मिळाला होता. अस्तित्वाला नाव मिळालं होतं. जीवनाला साफल्य मिळालं होतं आणि मृत्यूलासुद्धा सार्थकता आली होती. या सगळ्या आनंद-सोहळ्यात दुपार उलटून गेली.

ज्ञानेश्वर, निवृत्तीदादा, सोपान, मुक्ता आणि इतर काही निवडक मंडळी नामदेवाच्या घरी जेवणास गेली. नामदेवाची पत्नी राजाई, आई गोणाई, वडील दामाशेटी सगळे आनंदले होते. मोठ्या अगत्यानं आणि प्रेमानं त्यांनी या मंडळींचं स्वागत केलं. जनाबाई सगळी धावाधाव करत होत्या. नामदेवांची बहीण आऊबाईनं मुक्ताला हाताला धरून आत नेलं. निवृत्तीदादा, ज्ञानादादा यांच्या सभोवती संत मंडळींचा गराडा पडला होता. नामदेवांनी त्या दोघांनाही हाताला धरून आत नेलं. त्यांना बैठकीवर बसवून, दोन गोष्टी बोलत नामदेव तिथेच थांबले. निवृत्तीदादाच्या मागून शांतपणे पावलं टाकत, सगळीकडे नजर फिरवून अवलोकन करत सोपान येत होता. तोच नामदेवांची दोन्ही मुलं धावत वाड्याच्या दाराशी आली. सोपान अजून आत यायचाच होता. तोच नामदेवांच्या दोन्ही मुलांनी सोपानाचं हात धरले आणि मोठ्या लाघवीपणे दोघं जण म्हणाली, ''काकाऽऽ! चला ना आत ! तुम्ही.. तुम्ही सोपानकाका ना? म्हणजे... म्हणजे सोपानदेव ना? म्हणजे तुम्ही सोपानकाकाच! सोपानकाका चला ना आत! काका चला नाऽऽ!'' नामदेवांची दोन्ही मुलं नारा, विठा मोठी लाघवी, प्रेमळ होती. सोपानाच्या हाताला धरून ती त्याला आत घेऊन आली. नामदेव सोपानाला आणायला जाण्यासाठी मागे वळले, तोच समोर सोपान ! त्याचे दोन्ही हात दोन्ही मुलांनी धरले होते. नामदेव मागे वळलेलं बघून नारा म्हणाला, ''बाबा, आम्ही तुमचं काम केलं! आम्ही सोपानकाकांना हाताला धरून आत घेऊन आलो. होय किनई हो सोपानकाका?'' नारानं लाघवीपणानं विचारलं. सोपानानं हलकेच हसून मान डोलावली. तोच नाराच्या बोलण्याचा धागा पकडून गोरोबा म्हणाले, ''अरे वा! सोपानकाका का? बरं झालं! याऽ या! सोपानकाका या, असं इथं बसा!'' जोत्यावर आऊबाईच्या शेजारी मुक्ता बसली होती. तिनं हे ऐकलं! लगेच म्हणाली, ''अय्याऽऽ! सोपानदादाचा सोपानकाका झाला का? अगदी समर्पक नाव मिळालं सोपानकाका तुम्हाला! नाहीतरी अलीकडे तू सतत एखाद्या दुड्ढाचार्या-सारखाच वागतोस आणि बोलतोस! हे नाव तुला छान शोभून दिसतंय! सोऽपाऽनऽकाऽकाऽऽऽ! होय ना रे निवृत्तीदादा?'' सोपानाची छेड काढायची संधी सोडेल, ती मुक्ता कसली? तिनं सोपानाची छेड तर काढलीच; पण त्यासाठी निवृत्तीदादाची साक्षही काढली. तीही इतक्या खुबीनं आणि इतक्या लडिवाळपणानं, की निवृत्तीदादाला 'होय' म्हणावंच लागलं. निवृत्तीदादानंही होकार देताच सोपान थोडासा हिरमुसला. त्याच्या चेहऱ्यावरून ते निवृत्तीदादानं ताडलं. अत्यंत प्रेमानं आणि अभिमानानं आपल्या या धाकट्या भावाकडे बघत निवृत्तीदादा म्हणाला, ''मुक्ते, मस्करी बाजूला राहू दे; पण काका हे संबोधन मिळायलाही मोठं भाग्य लागतं. कारण काका म्हणजे चुलता आणि चुलता म्हणजे दुसरा पिताच असतो. आपल्याला कुणी काका म्हणणं, हा आपला बहुमान असतो सोपाना!

या निरागस लेकरांनी 'सोपानकाका' असं संबोधून तुला त्यांच्या वडिलांची जागा दिली आहे. तुझ्या विचारी, समंजस, मितभाषी स्वभावाला तर हे संबोधन मोठं शोभून दिसतंय. तुझ्या वागण्या-बोलण्यातलं प्रौढत्व, विचारांची सखोलता आणि ज्ञानाची विशालता तुला या सगळ्यांचाच तीर्थरूप स्वरूप होण्याचा संकेत देत आहे!'' निवृत्तीदादाचं हे बोलणं ऐकून सगळ्यांनी आनंदानं टाळ्या वाजवल्या. चोखोबा आपल्या जागेवरून उठून उभे राहिले आणि म्हणाले, ''हे अगदी आमच्या सगळ्यांच्या मनातलं बोललात महाराज तुम्ही! खरंतर हे लेकरू आमच्या सगळ्यांपरीस ऱ्हान हाय! पर सोपानकाका ह्येच नाव यांना शोभून दिसतंया! माउली, तुम्हाला पन असंच वाटतंय ना?'' चोखोबांचं बोलणं सगळ्यांनाच पटलं! ज्ञानादादाच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं! मोठ्या प्रसन्न चेहऱ्यानं ज्ञानादादा म्हणाला, ''योग्य, अगदी योग्य बोललात चोखोबा तुम्ही! आमचा सोपाना आम्हा सगळ्यांपेक्षा जरी लहान असला, तरी ज्ञानानं, विचारानं, वर्तनानं आणि समंजसपणानं तो आमच्यापेक्षा जराही लहान नाही ! त्याला सोपानकाका हे नामोनिधान अगदी शोभून दिसतंय! सोपाना, तुला आवडलं ना हे संबोधन? आता बोलायची वेळ खरंतर सोपानाची होती; पण तो संकोचला. इतका, की तो काहीच बोलला नाही. मग मात्र नामदेवांनी त्याला पुन्हा विचारलं, सोपानदेव, तुम्ही काही बोलत का नाही?'' आता मात्र सोपानाला बोलावंच लागलं. खाली मान घालून संकोचल्या स्वरात तो म्हणाला, ''निवृत्तीदादा, ज्ञानादादा मी काय बोलू? माझ्यासारख्या एका कोवळ्या वयाच्या कुमाराला या सर्वांनी काका ही उपाधी दिली, आपल्या वडिलांच्या जागी मला मानलं, हा माझा मोठा बहुमान आहे, असं मला वाटतं! या बहुमानाला मी पात्र आहे की नाही, हे मी जाणत नाही; पण या दोन छोट्या, निरागस मुलांनी मला सोपानकाका म्हणून संबोधलं आणि तुम्ही सगळ्यांनी ते उचलून धरलंत. निवृत्तीदादा, ज्ञानादादा, सगळ्यांसाठी सोपानकाका असलेला हा सोपानदेव तुमच्यासाठी मात्र सोपानच असू दे!'' सोपानानं काहीसं संकोचत सांगितलं. तोच पुन्हा खट्याळपणे मुक्तानं विचारलंच, ''आणि माझ्यासाठी तू सोपानदादा की सोपानकाका?'' ज्ञानादादानं तिचं नाक चिमटीत पकडलं आणि म्हणाला, ''मुक्ते, हे नाक मध्येमध्ये खुपसलंच पाहिजे का?'' तशी सगळे हसले. वातावरण मोठं प्रसन्न झालं होतं. हसत-खेळत, गप्पागोष्टी करत जेवणं झाली.

सोपानाशेजारी जेवायला बसलेली मुक्ता मात्र अधूनमधून त्याला खट्याळपणे ''काय सोपानकाका? काय सोपानकाका?'' अशा हाका मारत होती. या प्रसंगानं मात्र एक झालं. ज्ञानादादाबरोबरच सगळ्यांना बाकी तिघांबद्दल किती आदर आहे, किती स्नेह आहे, हे सिद्ध झालं आणि सोपान सगळ्या लहान-मोठ्यांचा सोपानकाका झाला. सगळे जण त्याला 'सोपानकाका' असे संबोधू लागले.

सगळया भगवद्भक्तांच्या, सगळया वारकऱ्यांच्या त्या मनोमीलनातून भागवत धर्माची पताका कायम फडकत ठेवायची, असं त्या दिवशी पंढरपुरात विठुरायाच्या साक्षीनं नक्की झालं आणि भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार सर्वत्र करायचा आणि त्याचबरोबर पांडुरंगाची भक्ती करायची, असं सर्वानुमते ठरलं. हे सगळं होईपर्यंत दिवस मावळला. बाकीची मंडळी परतली. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता हे चौघंजण नामदेवाच्या घरी राहिली. (क्रमश:)

**- सौ. मंजुश्री गोखले,** मोबा. ८८०५३५५२००

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

## ।। अवीट गोडीचे श्रीरामायण ।। लाडके कौसल्ये राणी

उदास कां तूं ? आवर वेडे, नयनांतिल पाणी
लाडके, कौसल्ये राणी

वसंत आला, तरूतरूवर आली नव पालवी
मनांत माझ्या उमलुन आली तशीच आशा नवी
कानीं माझ्या घुमूं लागली सादाविण वाणी

ती वाणी मज म्हणे, दशरथा, अश्वमेध तूं करी
चार बोबडे वेद रांगतिल तुझ्या धर्मरत घरी.
विचार माझा मला जागवी, आलें हें ध्यानीं

निमंत्रिला मी सुमंत मंत्री आज्ञा त्याला दिली –
वसिष्ठ, काश्यप, जाबालींना घेउन ये या स्थली.
इष्ट काय तें मला सांगतिल गुरुजन ते ज्ञानी

आले गुरुजन, मनांतलें मी सारें त्यां कथिले
मीच माझिया मनास त्यांच्या साक्षीनें मथिलें
नवनीतासम तोंच बोलले स्निग्धमधुर कोणी

तुझे मनोरथ पूर्ण व्हायचे, मनोदेवता वदे,
याच मुहूर्ती सोड अश्व तूं, सत्वर तो जाउं दे
मान्य – म्हणालों – गुर्वाज्ञा मी, कर जुळले दोन्ही

अंग देशिंचा ऋष्यश्रुंग मी घेउन येतों स्वतः
त्याच्या करवी करणे आहे इष्टीसह सांगता
धूमासह ही भारुन जावो नगरी मंत्रांनीं

सरयूतीरीं यज्ञ करूं गे, मुक्त करांनी दान करूं
शेवटचा हा यत्न करूं गे, अंती अवभृत स्नान करूं
ईप्सित तें तो देइल अग्नी, अनंत हातांनीं

गीत रामायणातील हे चौथे गीत राजा दशरथाच्या तोंडी आहे. उदास झालेल्या आपल्या राणीला राजा आपले मनोरथ सांगतो आहे. हे एक आशादायक भविष्य वर्तवणारे गीत आहे. आपल्या दुःखी महाराणीकडे पाहून राजाच्या मनात आशेचा किरण येतो. तो तिला सांगतोय की आपण अश्वमेध यज्ञ करू. त्यासाठी काय काय करावे लागेल आणि त्या यज्ञाचं फलीत काय असेल ते राजा कथन करीत आहे. दुःखा नंतर सुख येणार आहे असे नुसते मनात जरी आले, तरी आपल्याला बरं वाटतं. रघूवंश पुढे जाणार आहे, राज्याला, रघूवंशाला वारस मिळणार आहे. त्यासाठी आतापर्यन्त खूप प्रयत्न करून झाले आहेत. आता हा शेवटचा प्रयत्न करू. माझी मनोदेवता सांगते आहे की हा यत्न नक्कीच फळ देईल. असे राजा दशरथाने सांगितल्यावर कौसल्याही आनंदित होते. **– सुधीर दाजी जोशी,** ९८२२२९८७२६

---

# कोल्हापूर चित्पावन संघाचा 'खाद्य महोत्सव २०२६'

नमस्कार चित्पावन बंधू आणि भगिनी !

आपल्या चित्पावनांची फर्माईश म्हणून यंदाही आपण **चित्पावन खाद्य महोत्सवाचे** आयोजन करीत आहोत. विद्यार्थी गुणगौरव आणि त्यानंतर आपल्या जीभेचे चोचले पुरवणारा आपल्याच चित्पावन बंधू आणि भगिनींनी केलेल्या चविष्ट खाद्यपदार्थांचा मस्त असा खाद्य महोत्सव...! चला तर मग पुन्हा एकदा आपल्यातील लपलेल्या शेफला जागं करूया...! आणि आपल्या अनोख्या खाद्यपदार्थांनी आपल्या आप्तस्वकीय चित्पावनाना तृप्त करूया...! चला **'खाद्य महोत्सव २०२६'** साजरा करूया...! कोल्हापूर चित्पावन संघ व वुई फॉर अवर्स तर्फे आयोजित... **चित्पावन खाद्य महोत्सव मंगलधाम हॉल, बिनखांबी गणेश मंदिर जवळ, कोल्हापूर येथे शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी ७.०० ते रात्री ९.०० आयोजित केला आहे.**

**चित्पावन खाद्य महोत्सव २०२६ :**

१. यामध्ये प्रत्येकी एक स्टॉल देण्यात येईल.
२. प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी दिली जाईल.
३. स्टॉलसाठी बुकिंग आवश्यक असेल. रुपये २००/- एका स्टॉलसाठी सहभाग शुल्क असेल.
४. एका प्रकारच्या खाद्य पदार्थाचा एकच स्टॉल देण्यात येईल.
५. बाहेरून कोणाचाही तयार पदार्थ आणू नये.
६. सर्व खाद्यपदार्थ सहभागी स्टॉल धारकांनी स्वतः बनवून आणायचे आहेत.
७. पदार्थ गरम करण्याचे साहित्य, देण्यासाठी डिश - चमचे इ. स्वतः आणायचे आहेत.
८. खाद्यमहोत्सवामध्ये भाग येणारे स्टॉलधारक व येणारे रसिक आस्वादक यांच्यासाठी खास लकी ड्रॉ ठेवण्यात आला आहे.

**अधिक माहितीसाठी व बुकिंगसाठी संपर्क :**

**श्री. अमेय गोखले ८४०८०६५२००, श्री. महेश पटवर्धन ९८२२७८७९३१, सौ. संगीत आपटे ८१४९४८००३४**

**विशेष सूचना :** याच दिवशी या कार्यक्रमाआधी चित्पावन संघाच्या शैक्षणिक गुणगौरव उपक्रमा अंतर्गत बक्षीस वितरण समारंभ मंगलधाम येथे होणार आहे. यानंतर खाद्य महोत्सव होणार आहे. आणि या कार्यक्रमांत सहभागी सभासद, विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक खाऊचे कूपन रु. ५०/- मोफत भेट देण्यात येईल.

## मनाला खुपणारं कागदावर

# प्लास्टिकचा भस्मासूर

**(लेखांक १४)**

प्लास्टिक हे यंत्रयुगात मानवाला मिळालेलं खरं तर वरदान आहे. पण या प्लास्टिकच्या अनिर्बंध, अयोग्य आणि अति वापरामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे प्लास्टिक हे वरदान नाही, तर शाप वाटू लागते. हे प्लास्टिक पाण्यात विरघळत नाही, जमिनीत कुजत नाही, हवेमध्ये वाळून नाहिसं होत नाही. या प्लास्टिकचा उपयोग इतका मोठ्या प्रमाणावर केला जातो की प्लास्टिकशिवाय जगताच येणार नाही. म्हणजे विना प्लास्टिक विकसीत जगापुढे पर्याय नाही. त्यामुळे तुझं माझं जमेना तुझ्यावाचून चालेना ही उक्ती प्लास्टिक प्रदूषणाच्या बाबत वापरावीशी वाटते.

प्लास्टिक हे एखाद्या बहुआयामी व्यक्ती-प्रमाणे आहे. जाड, पातळ, कठीण, लवचिक अशा गुणधर्माचं प्लास्टिक निर्माण करता येते. जाड आणि कठीण, जाड पण लवचिक, पातळ पण कठीण, पातळ आणि लवचिक, अगदी पातळ पापुद्र्याप्रमाणे, विविध रंगाचे प्लास्टिक निर्माण करता येते. यामुळे असंख्य प्रकारच्या उद्योगधंद्यामध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो.

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकांत या प्लास्टिकचा शोध लागला. तेव्हापासून प्लास्टिकची घोडदौड सुरू झाली. आज प्लास्टिकने मानवी जीवनाशी निगडीत प्रत्येक क्षेत्र व्यापून टाकले. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी प्लास्टिकचा संचार आहे. घरांत, दारांत, रस्त्यात, ओढ्यात, नदी, नाले, समुद्र या सर्व ठिकाणी प्लास्टिक असतंच, पण जगातलं सर्वात उंच शिखर माऊंट एव्हरेस्टरवर प्लास्टिक जमलेलं दिसतं. प्लास्टिकचा कचरा नाहीसा कसा करायचा हे मानवापुढील आव्हान आहे आणि त्याबरोबरच प्लास्टिकचा वापर थांबवणेही अशक्य आहे !

सकाळी उठल्यावर प्रथम प्लॅस्टिकच्या टूथब्रशने, प्लॅस्टिकच्या पेस्टमधील दंतमंजन घेऊन दिवस सुरू होतो. तर चहा करण्यासाठी गृहिणीला दूध असलेली प्लास्टिकची पिशवी हातात घेऊन दिवसाचा श्रीगणेशा करावा लागतो. आपल्या देशांत एकूण प्लास्टिक वापरापैकी ४०% प्लास्टिक हे विविध वस्तू, औषधे, सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ यांच्या पॅकिंगसाठी वापरले जाते. वस्तू काढून घेतली की याचा कचराच होतो. बांधकामामध्ये २०% प्लास्टिक वापरले जाते. हे गंजत नाही त्यामुळे खिडक्यांची चौकट, दारे, शोभिवंत छप्पर (रूफ) यासाठीही वापरले जाते. पुन्हा पुन्हा रंग द्यावा लागत नाही त्यामुळे याचा वापर अत्यंत सोयीचा ठरतो. शिवाय विविध रंगातही हे उपलब्ध होते. आपल्याकडे विविध रंगांच्या, विविध प्रकारच्या प्लास्टिक पिशव्या खूप मोठ्या प्रमाणावर वापरल्या जातात. पाण्याच्या बाटल्या, लहान-मोठे डबे, भांडी, घरावर किंवा घरांत ठेवल्या जाणाऱ्या पाणी साठवण्याच्या टाक्याही तसेच डस्टबिन, धोबी बॅग, प्लास्टिकच्या असतात. आजकाल फर्निचर, सोफा, खुर्च्या, खेळणी, फोन इ. प्लास्टिकशिवाय निर्माण होत नाहीत. टी.व्ही., कॉम्प्युटर यामध्येही प्लास्टिकच असते. यांचा देखणा बाह्यस्तर हे प्लास्टिकचंच देणं असते. इलेक्ट्रीक फिटींग, इलेक्ट्रीक वायरवरचं कोटिंगलाही याचीच फार गरज असते. बागेतल्या कुंड्या, फ्लॉवर पॉटस्, बागेत झाडांना पाणी घालण्यासाठी वापरली जाणारी पाईप यांच्याशिवाय जन्मालाच येत नाही.

अंघोळ व इतर कामासाठी वापरल्या जाणाऱ्या बादल्या, तांबे इ. प्लास्टिकचेच असतात. घरात, दवाखान्यात, कार्यालये इ. ठिकाणी दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या पाण्याचे वहन करणाऱ्या नळ्याही प्लास्टिकच्या असतात. जोडीला नळही

प्लास्टिकचेच. विजेच्या कामासाठी लागणारे विविध साहित्यही यापासूनच बनते. दोन चाकी, चार चाकी वाहने, रेल्वे, अगदी विमानांतही प्लास्टिकपासून बनवलेल्या अनेक भागांचा वापर त्यांच्या जोडणीसाठी केला जातो. लिखाणाचे साहित्य, पेन इ. किल्ली ठेवण्याच्या साखळ्या, चष्म्यांची फ्रेम, काचा, चष्म्याची बॉक्स, हेल्मेट (शिरस्त्राण) यासाठीही खूप मोठ्या प्रमाणांत प्लास्टिक वापरले जाते. इंजेक्शन देण्याच्या सिरींजपासून वैद्यकीय क्षेत्रांसाठी लागणाऱ्या अनेक अत्यावश्यक साधनामध्ये प्लास्टिकचा वापर अनिवार्य ठरतो आहे.

ही यादी अजून खूप मोठी करता येईल, पण त्याची गरज नाही. कारण आपल्यापैकी प्रत्येकाला दैनंदिन जीवनांत आपण प्लॅस्टिकचा वापर टाळू शकत नाही, याची जाणीव आहे. त्याचबरोबर शक्य असेल तेथे आणि त्या विशिष्ट प्लास्टिक वस्तूंचा वापर आपण कमीत कमी केला पाहिजे. याचे भान किंवा जाणीव आपण ठेवली तर प्लास्टिक प्रदूषणाचा भस्मासूर आपण निश्चितच नियंत्रणात ठेवू शकू. पण यासाठी प्रत्येक पातळीवर सजगता आवश्यक आहे. प्लास्टिकची नव्याने निर्मिती करण्याऐवजी जुन्या प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. यासाठी प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक घटक, प्रत्येक संस्था यामुळेच प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण कमी किंवा नियंत्रणात आणणे शक्य आहे.

प्लास्टिक प्रदूषण हे प्रामुख्याने एकदाच वापरता येणाऱ्या प्लास्टिकमुळे होते. यामध्ये प्लास्टिक बाटल्या, स्ट्रॉ, कॅरी बॅग्ज, जेवणाची ताटे, ग्लास, सॅनिटरी साधने, मास्क, पॅकिंगसाठी वापरलेले प्लास्टिक, सलाईन इ. अनेक वस्तूंचा समावेश होतो. शिवाय काटे चमचे, इयर बडस् यांसारख्या असंख्य वस्तूंची भली मोठी यादी एकदाच वापरून टाकून द्याव्या लागणाऱ्या वस्तूत करता येईल. यातील वैद्यकिय कचरा सोडल्यास इतर वस्तू कुठेही टाकल्या जातात. मी अनेक वेळा पाहिले आहे कारमधून जाणारी व्यक्ती पाण्याची बाटली खिडकीतून बाहेर रस्त्यावर फेकून देते. या वस्तू सूर्यकिरणातील उष्णता, वारा, पाण्याचा प्रवाह यामुळे लहान तुकड्यात तुटतात. त्यांना मायक्रोप्लास्ट, नॅनोप्लास्ट म्हटले जाते. ५ मीमी पेक्षा लहान तुकडा म्हणजे मायक्रोप्लास्ट आणि १०० नॅनो मायक्रॉनपेक्षा लहान तुकडा म्हणजे नॅनोप्लास्ट. हे घटक जमीन, पाणी याद्वारे अन्नाच्या साखळीत जातात. समुद्राच्या पाण्यापासून जे मीठ मिळतं त्यामध्येही हे घटक असतात. झाडातही पाण्यावाटे हे सूक्ष्म कण जातात. मैला वाहून नेणाऱ्या नळ्या यामुळे तुंबतात. ओढे, नाले, नद्या यांत साठलेल्या प्लास्टिकमुळे पुराचा धोका वाढतो. पाण्यावर तरंगणाऱ्या प्लास्टिकमुळे सूर्यकिरणांना पाण्यात खोलवर जाण्यापासून प्रतिबंध होतो. याचा दुष्परिणाम पाण्यात वाढणाऱ्या सूक्ष्म जीवांवर होतो. पाण्यात राहणारे विविध प्रकारचे मासे, कासव इ. नाही धोका पोहोचतो. हे प्लास्टिक प्राण्यांच्या पोटात गेले तर ते पचत नाहीच, पण त्याच्या असण्याने भूकही लागत नाही आणि भोवती अन्न असूनही उपासमारीने तो प्राणी मरतो !

कॅरी बॅगमध्ये खाद्यपदार्थ घालून ते कुठेही टाकले जातात. मोकाट गायी, कुत्री हे जेव्हा ते अन्न खाण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी ती कॅरीबॅग त्यांच्या पोटात जाऊन मृत्यू येऊ शकतो. मध्यंतरी मी एक घटना वाचली. अन्न खाताना कॅरी बॅक गायीच्या घशांत चिकटून बसली. गाय तडफडू लागली. दोन तरूणांनी धाडसाने तिचा खालचा, वरचा जबडा मोठा उघडून ती पिशवी काढली.

प्लास्टिक प्रदूषणामुळे मानवी आरोग्य, प्राणी, जीवन, पर्यावरण संस्था, वातावरण इ.वर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास आणि संशोधन सुरू आहे. पण हे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येकानं सिंगल युज प्लास्टिकचा कमीत कमी उपयोग तर केलाच पाहिजे आणि बेजबाबदारपणे या वस्तू मी कुठेही टाकणार नाही असा निश्चय केला पाहिजे. गाडीतून जाताजाता पाण्याच्या बाटल्या, उरलेल्या अन्न असलेल्या

कॅरीबॅग्ज, गाडीच्या खिडकीतून वाटेवर फेकणं किंवा पुलावरून नदीच्या पाण्यांत टाकणे हा बेजबाबदारपणा सोडला पाहिजे. कचरा गाडी/घंटा गाडीतच या वस्तू दिल्या पाहिजेत.

सहलीला जाताना सिंगल युज प्लास्टिकचे ग्लास, प्लेटस्, चमचे इ. नेण्याऐवजी घरातील पेले, ताटल्या नेता येतात. मी बऱ्याच वेळेला भाजी आणायला जाते. त्यावेळी स्वत:ची कार किंवा स्कूटर घेऊन येणाऱ्या स्त्री-पुरुषांकडे एक कापडी पिशवी कशी काय नसते याचं मला नवल वाटतं. पर्समध्ये कापडी पिशवीची घडी राहू शकते, मग ती स्कूटरच्या डिकीत किंवा कारच्या पुढील सीटसमोर असलेल्या खणांत नक्कीच मावू शकेल. तुम्ही म्हणाल, अहो, आयत्या वेळी ठरलं असेल, मग काय करणार? पण चेहऱ्यानं यातील काही जणींना मी ओळखते. भाजी घ्यायची आणि भाजी वाल्याकडे कॅरी बॅगची मागणी करायची. तो नाही म्हणू शकत नाही. कारण त्याच्या चरितार्थाचं हे साधन असतं. मग साहजिकच तो सिंगल युज कॅरी बॅग्ज ठेवतो. अशा कॅरी बॅग्ज ठेवणं हा भाजी विकणाऱ्याचा दोष नक्कीच नाही, तर स्वत:कडे कायमस्वरूपी कापडी पिशवी न ठेवणाऱ्या व्यक्तींचा तो बेजबाबदारपणा असतो.

याऊलट या कामातून मला नावलौकिक, पैसा इ. मिळेल का? या कशाचाही विचार न करता हिमाचल प्रदेशांतील हिमालय आणि पर्यावरण यावर विलक्षण प्रेम करणारे तरुण, तरुणी एकत्र येऊन तिथे जागोजागी साचलेले प्लास्टिक निवडून पुनर्वापरासाठी पुढील प्रक्रिया करतातच. शिवाय घराघरांत जाऊनही प्लास्टिक गोळा करून आणतात. स्वत:बरोबर अनेकांना सजग करतात. दोन-तीन वर्षांपूर्वी अशा पर्यावरण समूहाविषयी माझ्या वाचनात आले, आपल्या घरात जमणारा कोरडा कचरा म्हणजे ९९% प्लास्टिकच असते. महानगरपालिका पातळीवर योग्य पावले उचलली गेली तर प्लास्टिक प्रदूषण निश्चितच कमी होईल. आपण टाकलेल्या बाटल्या, ग्लास इ. गोळा करून रिसायकलिंगसाठी योग्य ठिकाणी नेऊन देणारे लोकही प्रदूषण कमी करण्यासाठी फार मोठा हातभार लावतात असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

मला काय करायचंय? मी एकट्यानं करून काय होणार असा विचार न करता प्रत्येक जण जबाबदारीने वागल्यास प्लास्टिक प्रदूषणाचा भस्मासूर निश्चितच शांत होईल. या लेखांत याआधी उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने सजगपणे वागून आपला खारीचा वाटा उचलला तर स्वत:बरोबर पुढील पिढ्यांचे जगणे अधिक निरोगी आणि आनंददायी करण्याचे श्रेय आपल्याला, खरं तर फार मोठं पुण्य आपल्या पदरी पडेल असे म्हणावेस वाटते. मग करू या ना ! असे वागण्याचा निश्चय या क्षणापासूनच, याबरोबरच सिंगल युज प्लास्टिक वस्तूंची निर्मिती करणारे कारखाने आणि त्यांचा वापर करणारे यांच्यावर शासनाकडून कडक आणि कायदेशीर कारवाई झाली पाहिजे आणि या कारवाईमध्ये सातत्य असले पाहिजे. प्रत्येक गोष्टीसाठी शासनानेच काहीतरी केले पाहिजे, अशी वाट पाहण्यापेक्षा प्रत्येकाने आपलेही काही कर्तव्य आहे या दृढ भावनेतून आपल्या दैनंदिन जीवनामध्ये बदल करणे अत्यावश्यक आहे. पुनर्वापर करता येण्यायोग्य प्लास्टिक वस्तूंचा वापर करणे प्रत्येकाने सुरू केलं तर या भस्मासूरावर नक्कीच नियंत्रण ठेवता येईल. ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, नगरपालिका, महानगरपालिका पातळीवर प्लास्टिक विरोधी मोहिम राबविणे परिणामकारक झाल्याचे आढळते.

यासह गणेशोत्सव, विवाह समारंभ, सामाजिक कार्यक्रम, सांस्कृतिक समारंभ इ. ठिकाणी प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळावा. सर्व स्तरांतील गृहिणींचीही जागृती करण्याने खूप काही साध्य होऊ शकेल असे वाटते. फक्त त्यासाठी सर्व पातळीवर प्रत्येकाने जागरूक राहिले पाहिजे. ''केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे'' हेच खरे !

**– कमल हर्डीकर,** मोबा. ९६८९३६९९२६,
९४२०४५८४२५

पान ५ वरून पुढे...

# अनुसयाबाई काळे

स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यायचा त्यांनी निर्णय घेतला आणि अनुसयाबाईनी बाजी मारली. स्वातंत्र्य-संग्रामात त्या सहभागी झाल्या. सविनय कायदेभंग लढ्याच्या वेळी त्यांनी लेजिस्लेटिव असेंब्लीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. लवकरच प्रांतिक कौन्सिलची निवडणूक होणार होती. त्यावेळी निदर्शन करीत असताना त्यांना अटक करण्यात आली आणि चार महिन्याची सक्तमजुरीची शिक्षाही त्यांना झाली. १९४२ चा लढा सुरु झाला. प्रमुख नेते पकडले गेले आणि नागपूर शहर पेटून उठले. त्यावेळी मार्शल लॉ जारी करण्यात आला. अशा प्रसंगी जखमी व शहीद झालेल्या लोकांच्या नातेवाईकांना भेटून दिलासा देणे, जखमी लोकांवर उपचार करणे इत्यादी कामांना त्यांनी सुरवात केली. चिमूर येथे झालेल्या भयानक अत्याचार प्रसंगी तेथील स्त्रियांना भेटून त्यांना दिलासा दिला, साहाय्य केले. प्राध्यापक भन्साळी यांचे उपोषण सुटावे म्हणून त्यांनी यशस्वी प्रयत्न केले. विशेषतः चिमूरच्या भयानक प्रसंगी ज्या स्वातंत्र्यसैनिकांना फाशीची शिक्षा झाली होती ती रद्द व्हावी म्हणून स्थापन केलेल्या समितीच्या त्या अध्यक्ष होत्या. त्यांच्या अविरत प्रयत्नामुळे त्या शिक्षा रद्द झाल्या. संपूर्ण भारतातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. १९५८ मध्ये ही ज्येष्ठ कर्ती स्वातंत्र्यसैनिक तृप्त मनाने मृत्यूला कवटाळून भारताशी एकरूप झाली

**– वैदेही जोशी,** मोबा. ९५४५६३५४६५

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**बुधवार, दि. १२ : पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर**

**0231-2546585**

पान ८ वरून पुढे...

### मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

प्रमुख अर्थार्जनाचे साधन असल्यामुळे तिथे राज्य सरकारने छान सोयी केल्या आहेत. दुपारनंतर आम्ही रुद्रप्रयाग या ठिकाणी पोहोचलो. रुद्रप्रयाग येथे केदारनाथ होऊन येणारी मंदाकिनी नदी व बद्रीनाथ होऊन येणारी अलकनंदा नदी यांचा संगम आहे. रात्र होता होता आम्ही केदारनाथपासून काही अंतरावर असलेल्या शेरसी ह्या गावी मुक्कामाला आलो.

**– ओंकार गाडगीळ,** मोबा. ९८२२८७६९२२

**दिनविशेष ऑगस्ट २०२६ पराभवनाम संवत्सरे - निज आषाढ-श्रावण १९४८ सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**



**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**

**शनिवार दि. १ :** लोकमान्य टिळक पुण्यदिन, **रविवार दि. २ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.३३ वा.), फ्रेंडशिप डे, **रविवार दि. ९ :** ऑगस्ट क्रांतिदिन, **सोमवार दि. १० :** संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा, **गुरुवार दि. १३ :** श्रावण मासारंभ, पुण्यश्लोक. अहिल्याबाई होळकर पुण्यदिन, **शनिवार दि. १५ :** स्वातंत्र्य दिन, **सोमवार दि. १७ :** नागपंचमी, **बुधवार दि. २६ :** ईद-ए-मिलाद, **गुरुवार दि. २७ :** नारळी पौर्णिमा, **शुक्रवार दि. २८ :** रक्षाबंधन, **सोमवार दि. ३१ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ८.४८ वा.).

## विविध सामाजिक सत्कार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे

# माननीय श्री. आदेश गोखले



आदेश गोखले यांनी अलीकडेच IBM मध्ये कार्यकारी संचालक आणि IBM च्या पश्चिम भारता तील ऑपरेशन्सचे प्रमुख म्हणून त्यांची दीर्घ आणि उल्लेखनीय कारकीर्द पूर्ण केली आहे. त्यांना IT आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ३० वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. त्यांनी जागतिक ग्राहकांसाठी डिझाईन, बांधणी आणि व्यवस्थापन या वातावरणात अनेक मोठ्या आणि गुंतागुंतीच्या प्रकल्पांचे नेतृत्व करून ते यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. ऊर्जा आणि युटिलिटीज, वित आणि दूरसंचार हे त्यांच्या विशेष औद्योगिक कौशल्याचे क्षेत्र आहे. ते नेहमीच तंत्रज्ञानाच्या अग्रभागी राहिले आहेत आणि तंत्रज्ञान स्वीकारण्यात पुढे आहेत. त्यांना ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्मार्ट मीटर्स/स्मार्ट इलेक्ट्रिक ग्रिड आणि डेव्हऑप्स या क्षेत्रात जागतिक ग्राहकांसोबत काम करण्याचा व्यापक अनुभव आहे.

आदेश यांच्या नावावर तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि उत्पादन क्षेत्रात काही पेटंट्स आहेत. ते स्मार्ट सिटी, स्टार्ट-अप इंडिया आणि स्किल्स इंडिया या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी आहेत.

त्यांना स्मार्ट सिटी संकल्पनेत खोल अनुभव आहे आणि त्यांनी युरोप, अमेरिका आणि ऑस्ट्रे लिया येथे अनेक स्मार्ट सिटी प्रकल्पांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे.

विशाखापट्टणम, पुणे, अहमदाबाद, सूरत आणि इतर काही स्मार्ट सिटी प्रकल्पांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

आदेश हे स्टार्ट-अप एकोसिस्टममध्ये अत्यंत सक्रिय आणि प्रभावी आहेत. ते अनेक स्टार्ट-अप्सचे मार्गदर्शक आहेत आणि स्टार्ट-अप इनक्युबेशन सेंटर्सचेही मार्गदर्शक आहेत, जिथे ते नव्या कल्पना, तंत्रज्ञान, व्यवसाय मॉडेल्स आणि योजनांची संकल्पना करण्यास मदत करतात. त्यांनी ग्रामीण भागातील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयांमध्ये स्टार्ट-अप कार्यशाळा घेतल्या आहेत, ज्यामुळे नवोपक्रम संस्कृतीला चालना मिळावी आणि शहरी/ग्रामीण सीमारेषा दूर व्हाव्यात यावर विशेष भर दिला आहे.

आदेश हे स्मार्ट इंडिया हॅकाथॉन या उपक्रमाशी जवळून संबंधित आहेत. हा उपक्रम भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय आणि AICTE यांनी प्रोत्साहित केला आहे, आणि ते या कार्यक्रमाचे एक मार्गदर्शक आहेत.

आदेश हे NASSCOM, CII सारख्या अनेक मंचांवर वक्ते म्हणून सहभागी झाले आहेत.

त्यांचा शाळा/महाविद्यालयांशी २५ वर्षाहून अधिक काळाचा संबंध आहे. ते भारतभरातील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयांमध्ये अतिथी व्याख्याते म्हणून कार्यरत आहेत.

ते AICTE -आयडिया फंड समितीचे

**पान २० वर पहा...**

समाजभूषण पुरस्कार

# माननीय श्री. प्रकाशकाका दामोदर गद्रे



श्री.प्रकाशकाका गद्रे ( सर्वश्री प्रकाश दामोदर गद्रे) हे कोल्हापूर येथील विख्यात अशा दामोदर शिवराम आणि कंपनी या चहाच्या व्यवसायात शंभरीकडे वाटचाल करीत असलेल्या समूहाचे विद्यमान चेअरमन. एक हरहुन्नरी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व. बी. एस्सी. (राजाराम कॉलेज, कोल्हापूर)आणि नंतर मुंबई येथे फूड टेक्नॉलॉजी ची पदविका घेऊन १९६६ च्या सुमारास घरच्या व्यवसायात पदार्पण केले.पहिले व्यावसायिक धडे ज्येष्ठ बंधू दत्तात्रय उर्फ शामराव गद्रे यांच्याकडे कोलकाता(तेव्हाचे कलकत्ता) येथे घेऊन १९७०साली आसाममधील गुवाहाटी येथे स्थलांतरित झाले. गुवाहाटी येथे शाखा उघडून तेथे चहा व्यवसायातील अतिशय कठीण आणि महत्त्वाची अशी टेस्टरची भूमिका खंबीरपणे बजावली. दिवसाकाठी शंभरवर निरनिराळ्या चवी घेऊन त्यातील आपल्या ग्राहकांना आकर्षित करणारी चव निवडून नंतर त्यानुसार ब्लेंडिंग साठी बहुमोल सूचना करणे व त्यानुसार चहा तयार करणे ही कामगिरी गुवाहाटी शाखेतून जवळपास पंचवीस वर्षे समर्थपणे सांभाळीत कंपनीचे नाव उज्ज्वल करण्यासाठी अपार कष्ट केले. नंतर कोल्हापूर येथे परत आल्यावर कंपनीचे व्यवस्थापन तसेच हातकणंगले येथील कारखान्यात (सनराईज टी प्रोसेसिंग कंपनीत) आपलं योगदान देत आहेत. पुढील पिढीतील गद्रे कुटुंबीयांना व्यवसायात आपल्या अनुभवाचा फायदा देत वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शक म्हणून खंबीरपणे उभे आहेत. सध्या कंपनीचा शाखाविस्तार कोल्हापूर सह मुंबई,पुणे, गुवाहाटी,चिपळूण, अकोला, निपाणी, गोवा, संगमेश्वर, देवरुख,कराड येथे अतिशय उत्तम प्रकारे झाला असून त्यात ही प्रकाश काकांचा सिंहाचा वाटा आहे. एच पी आणि टी पॉट हे अतिशय लोकप्रिय ब्रँड कंपनीने विकसित केले आहेत. पूर्वसुरींच्या पुण्याईने आणि आशीर्वादाने बहरलेल्या दामोदर शिवराम आणि कंपनीला भविष्यकाळात आणखी प्रगती पथावर नेण्यासाठी चेअरमन या नात्याने समर्थपणे आजही वयाच्या ८२ व्या वर्षी काका उभे आहेत. काकांच्या दोन कन्या आपापल्या संसारात रममाण असून चिरंजीव चि. गौरव सॅन फ्रान्सिस्को येथे स्थायिक झाले आहेत. पत्नी सौ. प्रीती प्रकाश गद्रे यांच्या गतवर्षी झालेल्या दुर्दैवी निधनानंतरही काका आज कंपनीच्या दैनंदिन व्यवहारात सक्रिय आहेत. आजवर गद्रे कुटुंबीयांनी व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत समाजात एक चांगला संदेश दिला आहे. त्यातही काकांचा सक्रिय सहभाग आहे.कोल्हापूर चित्पावन संघाच्या विधायक कार्यात संपूर्ण गद्रे कुटुंबीयांनी आजवर सर्वप्रकारचे बहुमोल सहकार्य केलेले असून विद्यमान चेअरमन या नात्याने काकांचाही यात मोलाचा वाटा आहे.या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा कोल्हापूर चित्पावन संघाला सार्थ अभिमान आहे.

### समाजभूषण पुरस्कार

# माननीय डॉ. माधव श्रीकृष्ण खरे



डॉक्टरांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे १६/०७/१९४० रोजी चित्पावन ब्राह्मण परिवारात झाला.त्यांचे शालांत परीक्षेपर्यंतचे शिक्षण चिपळूण येथे तर इंटर सायन्सचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेज पुणे येथे झाले. पुण्यातच बी जे मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस पूर्ण करुन ससून हॉस्पिटलमध्ये काही काळ काम केले. नंतर पुणे विद्यापीठातून डि ओ एम एस ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९७० पासून आजतागायत कोल्हापूर शहरात नेत्र शल्यचिकित्सक म्हणून खाजगी व्यवसाय सुरू आहे. गेल्या पंचावन्न वर्षांपासून डॉ. खरे हे आपल्या शहरात नेत्ररोग उपचारासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहे. १९९८ साली सरांनी कोल्हापूर ऑप्थॅल्मिक सोसायटीची स्थापना करण्यात पुढाकार घेतला आणि पुढील सहा वर्षे सोसायटीचे अध्यक्ष म्हणून धुरा सांभाळत निरनिराळ्या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन सोसायटीचे माध्यमातून यशस्वीपणे केले. आजवर कोल्हापूर आणि आसपासच्या परिसरात हजारो रुग्णांवर नेत्रोपचार करून त्यांना नवीन दृष्टी देण्याचे सत्कर्म सरांनी केले आहे.आजवर दीडशेहून अधिक मोफत नेत्रोपचार शिबिरे सरांनी यशस्वीपणे पूर्ण केली आहेत.आजही वयाच्या सत्याऐंशीव्या वर्षी सरांचं रुग्णांना सल्ला देण्याचे काम अथकपणे सुरू आहे. सरांच्या धर्मपत्नी सौ. प्रतिभाताई याही डॉक्टर असून त्यांनी सरकारी रुग्णालयात बालरोगतज्ज्ञ म्हणून रुग्णसेवा केली आहे.सरांच्या कन्या डॉ. सौ. गौरी प्रसाद केळकर या सोलापूर येथे ऑन्को पॅथॉलॉजीस्ट म्हणून कार्यरत आहेत.तर सरांचे चिरंजीव डॉ.चिंतामणी हे सुद्धा नेत्ररोग तज्ज्ञ आहेत आणि वडिलांचा रुग्णसेवेचा वारसा कोल्हापुरात अत्यंत प्रभावीपणे पुढे चालवत आहेत. अशा या व्यक्तिमत्वाचा कोल्हापूर चित्पावन संघाला सार्थ अभिमान आहे. सरांना ईश्वर दीर्घायुरारोग्य देवो हीच मनोमन प्रार्थना.

---

पान १८ वरून... **माननीय श्री. आदेश गोखले** सदस्य, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणेचे माजी विश्वस्त आणि कार्यकारी समिती सदस्य आहेत.

आदेश यांजा IBM कडून बेस्ट इनोव्हेशन अवॉर्ड, अमेरिकन एक्सप्रेस आणि IBM कडून चेअरमन अवॉर्ड, तसेच त्यांच्या नवीन ऑक्सिजन थेरपी डिव्हाइससाठी फ्युचरिस्टिक आणि सस्टेनेब ल इनोव्हेशन फॉर पेशन्ट सेफ्टी अवॉर्ड मिळाले आहेत. अलीकडेच त्यांना 'कोजागर' आणि 'परशुराम' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन आणि NASSCOM कडून दोन वेळा ग्रीन IT पुरस्कार त्यांनी मिळवला आहे. ते 'मेडीपर्व' या कंपनीचे सह-संस्थापक आहेत. त्यांचा सध्याचा संशोधन प्रकल्प म्हणजे 'प्राचीन स्तोत्र आणि मंत्र विज्ञान' यांचा वैद्यकीय विज्ञानावर होणारा परिणाम सिद्ध करणे हे आहे.



पत्रकार सन्मान

## माननीय श्री. अजय मुकुंद केळकर

नाव – श्री. अजय मुकुंद केळकर
जन्मदिनांक : २७ जानेवारी १९७८

श्री. अजय केळकर हे मुळचे किर्लोस्करवाडी सांगली जिल्हा येथील आहेत. त्यांनी सांगली येथील लठ्ठे पॉलिटेक्निक येथून वर्ष १९९८ मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरींग मध्ये पदविका घेतली. यानंतर त्यांनी किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, तसेच अन्य काँही खासगी ठिकाणी ३ वर्षे नोकरी केली. वर्ष २००१ पासून त्यांनी पूर्णवेळ सनातन संस्थेसाठी धर्मप्रसाराचे काम करण्याचा निर्णय घेतला. यानंतर ते वर्ष २०१८ पर्यंत सनातन संस्थेच्या मिरज (सांगली) येथील आश्रमात राहून सेवा करत होते. वर्ष २०१८ नंतर ते आता कोल्हापूर येथील सनातन संस्थेच्या आश्रमात राहून पत्रकारितेची सेवा करतात. त्यांनी त्यांचे पूर्ण जीवन राष्ट्र आणि धर्म कार्यासाठी वाहून घेतले आहे!

श्री. अजय मुकुंद केळकर हे मागील २६ वर्षे दैनिक 'सनातन प्रभात' साठी वार्तांकनाची सेवा करत आहेत. सध्या ते 'सनातन प्रभात'साठी विशेष वरीष्ठ प्रतिनिधी म्हणून वृत्तांकनाची सेवा करत आहेत. सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांसाठी वार्तांकनासमवेत सोलापूर, देहू-आळंदी-पंढरपूर येथे वारकऱ्यांना येणाऱ्या विविध समस्या, त्यांना येणाऱ्या अडचणी, प्रशासकीय स्तरावरून होणारी दिरंगाई, इंद्रायणी-चंद्रभागा नद्यांचे प्रदूषण या संदर्भात सातत्याने वृत्त, लेख या माध्यमातून ते आवाज उठवत आहेत. वारकऱ्यांच्या प्रश्नांविषयी आवाज उठवल्याबद्दल त्यांचा आळंदी येथील वारकरी अधिवेशनात प.पू. स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता.



वैदिक सन्मान

## माननीय नामभक्त श्री. दत्तात्रेय बापट गुरुजी

विसावा चौक, गावभाग, सांगली येथे कधी सायंकाळी सातच्या सुमारास गेलात तर 'श्रीराम जयराम जय जय राम' ची धून तुमचे मन प्रसन्न करून जाईल आणि हा 'श्रीराम नामाचा जागर' गेली २० वर्षे अव्याहत आपल्या राहत्या वास्तूत अनेकांना एकत्रित करून नामजपयज्ञ करणारे श्री. दत्तात्रेय सदाशिव बापट गुरुजी आपल्याला भेटतील.

इयत्ता जुनी ११ वी पास असणारा हा नामभक्त पौरोहित्याच्या कामामध्येही अग्रेसर आहे. त्यांनी पौरोहित्याला लागणारे वैदिक ज्ञान कै. पुरुषोत्तम बापट गुरुजी यांचेकडून प्राप्त केले आहे. त्यांना त्यांच्या तिर्थरूप आई पार्वतीबाईंचे सहकार्यही चांगले मिळाले. असा हा छान पौरोहित्याचा व्यवसाय चालू असताना त्यांनी प.पू. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचा अनुग्रह घेतला. अखंड नामस्मरणाचा ध्यास त्यांचा जीवनमंत्र झाला.

त्यांना फलज्योतिषाचीही आवड आहे. त्यांनी स्वत:चे काही ठोकताळे बसविले आणि ज्योतिषशास्त्राची कोणतीही पदवी न घेता आपल्या ठोकताळ्यांच्या अनुभवावर व आध्यात्मिक प्रेरणेवर अनेकांना ज्योतिषविषयक सल्ले देऊन नैराश्याच्या गर्तेतून सन्मार्गावर आणले. आज अनेकजणांनी त्यांच्या ज्योतिर्विद्येचा अनुभव घेऊन आपल्या जीवन समस्येवर मात केली आहे.

नामस्मरण, प.पू.गोंदवलेकर महाराजांच्या वास्तव्याच्या ठिकाणी भेटी यातून त्यांना आपल्या सांगली भागात प.पू.गोंदवलेकर महाराजांची उपासना

मंडळे आहेत परंतु महाराजांच्या मूर्ती रूपातील दर्शनाची सोय नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी हरीपूर मुक्कामी गजानन कॉलनीच्या बाजूला एक छोटेसे पण टुमदार मंदीर स्वत:चा निधी खर्च करून बांधले आहे. त्यालाही आता बारा वर्षे होत आली. आजही अनेक गोंदवलेकर महाराज प्रेमी भक्त प.पू. गोंदवलेकर महाराजांच्या दर्शनाचा व मंदिरातील विविध कार्यक्रमाचा आनंद घेत आहेत.

श्री. बापट गुरुजींचा रामनामजपयज्ञ व मंदिरातील कार्यक्रम वर्षानुवर्षे चालू राहण्यामध्ये त्यांच्या सौ. पत्नी सविता व नित्य येणाऱ्या अनेकानेक नामभक्तांच्या सहकार्याचा हात नेहमीच असतो.

श्री. दत्तात्रेय बापट गुरुजींच्या अनेक धार्मिक संस्थांना व गरजू व्यक्तींना आर्थिक मदतीचा हात नेहमीच असल्याने अशा संस्था, व्यक्ती गरुजींच्या ऋणामध्ये राहणे आनंदाने पसंत करतात.

असे हे बहुआयामी, आध्यात्मिक आनंदात असणारे श्री. दत्तात्रेय बापट गुरुजी सांगली नगरीचे भूषण आहेत, हे निश्चित !



### सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार

# माननीय श्री. संजीव चिपळूणकर

कॉलेजमध्ये असतानाच सामाजिक क्षेत्राची जाणीव झाली आणि १९८१ मध्ये रोटरीच्या युवा क्लब असलेल्या रोटरॅक्ट मध्ये प्रवेश केला, १९८४ मध्ये तेथे प्रेसिडेंट झालो आणि त्या वर्षातील प्रशिक्षणामध्ये समाजकार्याचे बऱ्यापैकी शिक्षण मिळाले. पुढे बेस्ट प्रेसिडेंट किताब देखील मला मिळाला आणि समाजकार्याची जाणीव वाढत गेली. १९९१ मध्ये रोटरी क्लबमध्ये जॉईन झालो आणि मोठे प्रोजेक्ट करायला सुरुवात झाली. या क्लबमध्ये असताना चिमण्यांच्या घरट्याचा प्रोजेक्ट, रोटरी आयडॉल हा प्रोजेक्ट, पुढे राजाराम कॉलेज ग्राउंडवर मोठ्या प्रमाणात रेन वॉटर हार्वेस्टिंग व प्लांटेशनची कामे केली. त्यानंतर रोटरी नाना नानी पार्कच्या कामाला सुरुवात झाली. तेथे ज्येष्ठ नागरिकांसाठी मीटिंग हॉल, वर्तमानपत्रांची मोफत लायब्ररी, कमळाचे गार्डन, वॉकिंग ट्रॅक, लॉन अशा अनेक गोष्टी तेथे साकारल्या. राजाराम कॉलेज ग्राउंडवरच विहिरीचे बांधकाम देखील केले, जी पूर्णपणे मुरलेली होती, ती संपूर्ण गाळ काढून सुरू केली.

आता विविध नवनव्या संकल्पनांवर काम करण्यामध्ये मोठा आनंद मिळतो. त्यापैकीच एक म्हणजे चैत्र वैशाख याप्रमाणे हिंदू संस्कृतीचे कॅलेंडर गेली चार वर्षे आपण प्रकाशित करतो आहोत. तसेच कारच्या सनवायझर साठीचे एक्सटेंशन देखील माझ्या कारसाठी मी घरीच बनवले.

रेल्वे स्टेशनची सुधारणा, एसटी स्टँड भोवतीच्या ट्रॅफिकची शिस्त, ग्रामीण भागाच्या डेव्हलपमेंटसाठी देवराईपासून ग्रामीण महोत्सवांपर्यंत अनेक संकल्पना, इथेनॉलबाबत शुगर फॅक्टरीला स्वयंपूर्णता मिळावी यासाठी प्रयत्न, ओल्या कचऱ्यापासून गच्चीवर ऑरगॅनिक खताची निर्मिती, गच्चीवरील गार्डन, टेरेसवरील रूफ वॉटर हार्वेस्टिंग, गेल्या २५ वर्षापासून घरात वॉटर हीटर ऐवजी सोलर वॉटर हीटरची संकल्पना, अशा अनेक गोष्टी सातत्याने करीत आहे.

मी १९८५ पासून आज अखेर ४० वर्षापेक्षा अधिक काळ जाहिरात व्यवसायात कार्यरत असून या व्यवसायात सातत्याने नवनव्या संकल्पना मिळत जातात आणि त्याचा वापर सामाजिक कार्यासाठी केला जातो आता नव्याने प्लास्टिक कचऱ्यावर देखील काम सुरू केले असून प्लास्टिक कचरा होऊ नये यासाठी कापडी पिशव्यांचा वापर, वेस्ट प्लास्टिकपासून ऑइलच्या निर्मितीसाठी प्रयत्न तसेच वेस्ट प्लास्टिकमधून पॅकिंग पिशव्यांची निर्मिती, हॉटेलमधील अन्नपदार्थाचे प्लास्टिकमध्ये पॅकिंग

टाळून केळीच्या पानांमध्ये पॅकिंग करता येण्यासाठी प्रयत्न अशा अनेक संकल्पनांवर आता काम सुरू करणार आहे.

सध्या कचऱ्याची समस्या सर्वांनाच भेडसावते आहे. छोट्या पार्टीसाठी अनेक लोक कागदी प्लेट्स किंवा कागदी ग्लासचा वापर करतात. ज्यामध्ये पातळ प्लास्टिक फिल्म वापरली गेलेली असते. गरम पदार्थ त्यात घेतल्यास मायक्रो प्लास्टिक पोटात जाते व कॅन्सरचा धोका वाढतो. हे टाळले जावे व कचरा होऊ नये या संकल्पनेतून आम्ही स्टेनलेस स्टील भांड्यांच्या बँक देखील तयार केल्या आहेत. कोल्हापुरात त्याच्या सुमारे सहा ते सात शाखा असून ही भांडी डिपॉझिट ठेवून घेऊन जाणे आणि स्वच्छ करून परत देताना कोणत्याही रेंटची सक्ती नाही. आपली इच्छा असेल तर इच्छेप्रमाणे रेंट द्यावयाचा किंवा रेंट फ्री वापरायच्या. त्याचा प्रमुख हेतू कचरा होऊ नये हाच आहे. अशा पद्धतीने विविध प्रकारे कचऱ्यावर मार्ग शोधण्याचे विचार सुरू आहेत व ते चालू राहतील.

आता चित्पावन संघाद्वारे समाजसेवक पुरस्कार मिळाल्यामुळे माझी ही जबाबदारी आणखी वाढली आहे असे मला वाटते. या पुरस्काराबद्दल चित्पावन संघाला हार्दिक धन्यवाद व आभार!

---



### आदर्श माता पुरस्कार

## माननीय श्रीमती मनीषा नरेंद्र काळे

जन्म : जून १९७५ चा. बालपण तसे मध्यमवर्गीय कुटुंबातच गेले. वडील सरकारी नोकरीमध्ये, आई एक सामान्य गृहिणी. वडलांचा स्वभाव अतिशय कडक असल्यामुळे लहानपण कायम एका भीतीच्या वातावरणात गेले.

वयाच्या २२ व्या वर्षी घरच्यांनी लग्न करून दिलं. सासर जमखिंडी (कर्नाटक). सासरचे वातावरण एकदम विरूद्ध (व्यावसायिक) प्रकारचे. माहेरी वडलांच्या नोकरीमुळे सर्व कुटुंबाची दैनंदिनी घड्याळ्याच्या काट्यावर अवलंबून असे आणि सासरी घड्याळच माहिती नव्हते. कारण मेडिकलचे दुकान आणि शेती यामुळे रूटीन खूपच वेगळे होते.

आमच्या संसाराला जमखिंडीत सुरुवात झाली. माझे पती खूप चांगले होते. सात वर्षांचा संसार झाला. दोन मुले झाली आणि वयाच्या तिसाव्या वर्षापासून माझ्या आयुष्याची फरफट होण्यास सुरुवात झाली...

मुलगा ३ महिन्यांचा असताना मिस्टरांना कॅन्सरचे निदान झाले. पायाखालची जमीनच सरकली. मोठी मुलगी ४ वर्षांची आणि तान्हा मुलगा. परिस्थिती खूपच अवघड झाली. तश्यातच सासरच्यांनी आधीपासूनच त्रास द्यायला सुरुवात केली होती. दीर अतिशय धोकादायक स्वभावाचा होता. तो आर्थिकदृष्ट्याही खूप फसवत होता. तशात या घरात जगणे आणखीनच अवघड झाले.

तीन महिन्यांच्या तान्ह्या बाळाला आणि नवऱ्याला घेवून मुंबई गाठली. टाटा हॉस्पिटलमध्ये दोन वर्षे मुंबईमध्ये राहून उपचार घेतले. शेवटी काहीच उपयोग झाला नाही. या दोन वर्षांच्या काळात मुलांची खूप हेळसांड झाली. तशातच मुलाला बालदम्याचा त्रास सुरू झाला. त्याच्याकडे खूपच दुर्लक्ष झाले. एक वेळ तर अशी आली की एकीकडे मुलगा दवाखान्यात ॲडमिट आणि टाटामध्ये नवरा मृत्यूशी झगडत आहे ! माझी परिस्थिती अतिशय अवघड झाली होती. त्यानंतर काहीच दिवसांत आम्हाला डॉक्टरांनी सांगितले की, जास्तीत जास्त १ महिनाच आहे तुझा नवरा. दिवसभर खूप रडले. शेवटी अतिशय कठोरपणे निर्णय घेऊन मुंबईहून नवऱ्याला घेऊन जमखिंडी गाठली.

तिथून पुढे ते ६ महिने राहिले. जमेल तितकी सेवा केली, पण शेवटी ४ जानेवारी २००५ ला ते सोडून गेले आम्हाला !

आमची वणवण सुरू झाली. मी आणि माझी दोन लहान मुले आणि समोर फक्त अंधारच अंधार ! कसे जगायचे, काय करायचे काहीच कळत नव्हते !

नवरा गेल्यावर १० व्या दिवशी नणंद आणि दीर यांनी विचारले, 'तू काय करणार आहेस?' मी म्हटले, 'मी काय करणार? इथेच राहणार आणि कुठे जाणार?' तिथून पुढे सासरच्यांनी मला आतिशय त्रास द्यायला सुरुवात केली. आमची सासरची प्रॉपर्टी खूप होती, पण मला व माझ्या मुलांना सांभाळायचे नव्हते त्यांना ! आम्ही नकोसे होतो त्यांना !

अशाच धुसपुशीच्या वातावरणात १ वर्ष गेले. वर्षश्राद्धाच्या वेळी थोडी वादावादी झालीच होती. माझा दीर हा चांगला माणूस नव्हता. त्यामुळे मी नवरा गेल्यानंतर १५ व्या दिवशी मुलांना घेवून स्वतंत्र राहिले होते. त्यामुळे सासरचे लोक माझ्यावर चिडूनच होते. दिरांनी अनेक प्रकारे भांडणे काढून मला पळवून लावण्याचा प्रयत्न केला. पण मी गांव सोडून कोठेही गेले नाही. मी प्रॉपर्टीमधील माझ्या नवऱ्याचा हिस्सा मला द्या अशी मागणी केली. ती त्यांना मान्य नव्हती. त्यामुळे नाईलाजाने मला कोर्टाची पायरी चढावी लागली. सासरी माहेरी कोणाचाही भक्कम आधार नव्हता. फक्त दोन लहान मुलांना मोठे करायचे एवढेच डोक्यात होते. संपूर्ण संपत्तीचा कब्जा हा दिराकडे होता. तो लबाडी करून सगळं हडप करायला टपला होता.

२००६ ते २०१७ पर्यंत एकटीने कोर्टाचा लढा दिला. खूप त्रास सहन केला. शेवटी २०१७ ला कोर्टाच्या एका तारखेला हिम्मत करून कोर्टाला सांगितले, 'माझा दीर आणि सासरची माणसे निकाल लागूनही मला माझा हिस्सा देत नाहीत.' त्यामुळे पुढे २-३ वर्षात कोटाकडून ताबा मिळाला.

२००५ ला नवरा गेल्यावर मी २०१० पर्यंत जमखिंडीमध्येच रहात होते. २०१० साली मी कोल्हापूरला आले. तेही मुलांच्या शिक्षणासाठी. माझी दोन्ही मुले खूप हुशार आहेत आणि आपण कमी पडलो तर त्यांचे नुकसान होईल हा विचार सतत त्रास देत होता. २०१० ला मुलांना घेवून कोल्हापूर येथे वडलांच्या घरीच आले. पण स्वतंत्र घरात होते. तुटपुंज्या पगारावर काम करून मुलांचा सांभाळ केला. माझी मुलगी श्रद्धा तर खूपच हुशार आहे. पहिल्या इयत्तेपासून कायम पहिला क्रमांक तिने कधीच सोडला नाही. १० वी ला ९५%, १२ वी ला ९३%, मेकॅनिकल इंजिनिअरींगला प्रत्येक वर्षी स्कॉलरशिप मिळवून डिग्री मिळवली. चांगला जॉब मिळवला. बेंगलोरमध्ये २ वर्षे जॉब करून त्याचा राजीनामा देवून आता तिने मुंबईमध्ये स्वत:ची कंपनी काढून स्वत:च्या कंपनीत ४ इंजिनिअरना कामावर रुजू करून घेतले आहे.

मुलगा अवधूतही चांगला शिकला. आता कॉम्प्युटर इंजिनिअर झाला. तोही सध्या पुण्यातील कंपनीत जॉब करत करत स्वत:च्या हिमतीवर पुढील शिक्षण घेत आहे.

पती निधनानंतर आर्थिक, मानसिक, भावनिक, शारीरिक फरपट प्रचंड झाली. पण डोक्यात एकच होते, मुले चांगली घडली पाहिजेत. आणि आज खरंच माझी मुले खूप चांगली घडली आहेत. आपल्या कष्टाचे चीज झाले असे वाटते.

सध्या मी पुण्यात रहाते. सामाजिक जाणिवेतून दर शनिवार, रविवार १ तास पाच ते पंधरा वयाच्या मुलांना एकत्र आणून आपला सनतान धर्म, श्लोक, स्तोत्रे, योगा याबद्दल वेगवेगळ्या पद्धतीने माहिती सांगते. खेळ घेते. अशाप्रकारे लहान मुलांसाठी संस्कार वर्ग चालवते. तसेच पुणे महिला मंडळाची सदस्य असून तिथेही सक्रिय सहभाग घेते. माझ्या या कामाची दखल घेऊन पुणे महिला मंडळाने माझा गौरव करून मला सन्मानित केले आहे.

अपार कष्टानंतर आज कुठेतरी थोडेसे मानसिक समाधानाचे आयुष्य माझ्या वाट्याला आले आहे माझ्या !

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - ऑगस्ट २०२६)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स्वरूपा --- | यजुर्वेदी | २२/५/९७ ५.१ | कौशिक, मिथुन पुनर्वसू, आद्य | M.A. D.Ed. | नोकरी | मा.प्रा. १५,०००/- | विजय शामराव सजगुरे नाशिक ८९७५५३६४११ |
| २. | वैभवी --- | यजुर्वेदी | ५/६/९९ ५.३ | मौनस, मकर, धनिष्ठा, पहिले मध्य | B.Com. C.A. IFRS | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. १६ लाख | राम नारायण उन्हाळे चिंचवड, पुणे ९८५०९०६४२३ |
| ३. | वीणा --- | देशस्थ ऋ. | २७/७/९४ ५.५ | भारद्वाज, मीन उत्तरा, पहिले मध्य | B.A. LLB | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ३.६० लाख | विणा कुलकर्णी मुंबई ९८९२८५३६२२ |
| ४. | अनुजा (घटस्फोटीत) | यजुर्वेदी | १/८/९० ५.६ | कौशिक, वृश्चिक ज्येष्ठा, आद्य | M.Com. Dip in RPR | सरकारी बँक मॅनेजर नाशिक | मा.प्रा. ५०,०००/- | चंद्रशेखर वसंत कुलकर्णी नाशिक ९९७५४०६८१६ |
| ५. | स्नेहल --- | देशस्थ ऋ. | १५/१०/९५ ५.५ | पाराशर, मिथुन मृग, आर्द्रा तिसरे, आद्य | M.C.A. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ७ लाख | हरीश जोशी कोथरूड, पुणे. ९८२६७३५७७६ |
| ६. | अक्षदा | यजुर्वेदी | १०/८/९८ ५.३ | भारद्वाज, कुंभ पू.भाद्र, तिसरे आद्य | B.Sc. Micro D.Pharm | --- | मा.प्रा. --- | दिवाकर केशवराव देशपांडे मु.पो.रोहिणखेड ९५५२७९४८२५ |
| ७. | पूजा --- | यजुर्वेदी | १५/१२/९५ ५.० | भार्गव, सिंह उत्तराफाल्गुनी आद्य | M.Com. DTL | खाजगी नोकरी | वा.प्रा. --- | विनायक नागेश्वर अग्निहोत्री टिळक रोड, नंदुरबार ९९२२२९५७८२ |
| ८. | मधुरा --- | देशस्थ ऋ. | १९/८/९९ ५.५ | हरितस, वृश्चिक अनुराधा, पहिले मध्य | B.Com. C.A. | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. १३ लाख | सुनिल बाळकृष्ण पांडे औरंगाबाद ९४०३७४८०३२ |
| ९. | रेखा --- | देशस्थ ऋ. | ४/८/९५ ५.४ | कौंडिण्य, तूळ स्वाती, चवथे अंत्य | F.Y. B.A. | --- | वा.प्रा. --- | विजय रामदास किल्लेदार गंगापूर रोड, नाशिक ७८७५६९०१०३ |
| १०. | कल्याणी --- | देशस्थ ऋ. | २९/१०/९७ ५.३ | शांडिल्य, कन्या चित्रा, पहिले मध्य | B.Com. Yoga Instructor | ग्राम महसुल अधिकारी नाशिक | वा.प्रा. --- | निळकंठ सबनीस नाशिक ९८५०४३३८६८ |

**पियूषा अनिल कुलकर्णी (देशस्थ)**

**जन्मतारीख :** १२/१२/१९९८ **उंची :** ५ फूट

**शिक्षण :** M.Tech., Music Field

**नोकरी :** खाजगी नोकरी (कोल्हापूर) **वा.प्रा. :** १ लाख

**पत्ता : श्री. अनिल कुलकर्णी,**

राजारामपुरी, कोल्हापूर.

मोबा. 9325340906, 9421118235

**अपेक्षा :** अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | कन्या | हस्त | पहिले | आद्य | देव |

**आदिती शिवराम कुलकर्णी (देशस्थ)**

**जन्मतारीख :** १९/९/२००० **उंची :** ५ फूट

**शिक्षण :** B.Tech.

**नोकरी :** जे. पी. मॉर्गन, मुंबई **वा.प्रा. :** १५ लाख

**पत्ता : श्री. शिवराम कुलकर्णी**

गुलाबनगर, पाचगांव रोड, कोल्हापूर.

मोबा. 9422418585, 9405327575

**अपेक्षा :** अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | वृषभ | रोहिणी | पहिले | अंत्य | मनुष्य |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - ऑगस्ट २०२६)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिपक --- | --- | ८/१२/८६ ५.६ | वसिष्ठ, कुंभ शततारका, तिसरे आद्य, राक्षस | B.Com. GDC&A Soft Engg | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ६ लाख | संजय पुरुषोत्तम भातखंडे काकरतळे, महाड,जि.रायगड ९४२११५९६५९ |
| २. | आशुतोष --- | कऱ्हाडे | १५/१०/९३ ५.११ | काश्यप, कन्या चित्रा, मध्य, राक्षस | B.Com. | नोकरी | वा.प्रा. १३.१२ लाख | अरूण बोरवणकर पाचगांव, कोल्हापूर ९९७५२०८४०४ |
| ३. | सागर --- | कोकणस्थ | २९/१/९५ ५.६ | विष्णूवृद्ध, कन्या हस्त, तिसरे आद्य, देवगण | B.E. Mech. | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ९.१३ लाख | संदिप वसंत परांजपे कागवाड, शिरगुप्पी ७६७६९६३८४८ |
| ४. | वरद --- | कऱ्हाडे | १८/९/९१ १७१ सेंमी | काश्यप, धनु मूळ, तिसरे मध्य, मनुष्य | B.E. E & TC | नोकरी | वा.प्रा. ६ लाख | विश्वनाथ रामचंद्र पटवर्धन कोथरूड डेपो, पुणे ९४०४४९८६९३ |
| ५. | आदित्य --- | कोकणस्थ | २०/९/९६ ५.३ | वसिष्ठ, धनु मूळ, पहिले आद्य, राक्षस | Dip in Computer Dip. in Web Dev. | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ५ते६ लाख | समीर विक्रम पोंक्षे सुरज रेसिडेन्सी, मिरज ९४२२७४१५१९ |
| ६. | अजय --- | देशस्थ ऋ. | १८/२/९७ ५.१० | वसिष्ठ, मिथुन पुनर्वसू, दुसरे आद्य, देव | Dip. IT B.Sc. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५.३० लाख | अविनाश ह. देशपांडे कोथरूड, पुणे ९०११०६९१२४ |
| ७. | ऋषिकेश --- | देशस्थ ऋ. | २९/११/८८ ५.७ | वसिष्ठ, मकर, धनिष्ठा, दुसरे मध्य, राक्षस | B.C.A. | शेअर मार्केटिंग | वा.प्रा. ३.६० लाख | दिलीप चिप्पलकट्टी ब्राह्मणपुरी, मिरज ९८६०३४८१२५ |
| ८. | चिराग O +ve | कोकणस्थ | २/४/९४ ५.४ | कपी, धनु, मूळ, चौथे आद्य, राक्षस | B.E M.B.A. | मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | अविनाश मराठे मुंबई ९८३३१४७२९६ |
| ९. | शंकर --- | कोकणस्थ | ७/९/९३ ५.३ | शांडिल्य, मेष भरणी, चौथे मध्य, मनुष्य | B.Com. LIC Agent | खाजगी नोकरी | वा.प्रा. २.५ लाख | चंद्रशेखर सोमण तळकट भटवाडी, सिंधुदुर्ग ८२७५८०४३६९ |
| १०. | जयेश --- | देशस्थ | २४/१/२००१ ५.११ | जमदग्नी, मकर उत्तराषाढा, अंत्य मनुष्य | B.Tech | जिल्हा कोषागार रत्नागिरी | वा.प्रा. ५ लाख | आरती मनोज कुलकर्णी रत्नागिरी ९४२१४८७४५७ |

**सर्वेश चंद्रकांत सप्रे (कऱ्हाडे)**
**जन्मतारीख :** १५/०९/१९८९ **उंची :** ५.७ फूट
**शिक्षण :** M.C.A. / M.B.A.
**नोकरी :** पुणे येथे **वा. प्रा. :** 7 लाख
**अपेक्षा :** अनुरूप
**पत्ता : श्री. चंद्रशेखर सप्रे**
विजापूर रोड, सोलापूर
मोबा. 9561898872, 9673106943

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अत्री | कुंभ | पू.भाद्र. | तिसरे | आद्य | मनुष्य |

**सौरभ अजित गाडगीळ (कोकणस्थ)**
**जन्मतारीख :** ०८/११/१९९५ **उंची :** ५.४
**शिक्षण :** B.C.A./M.B.A.
**नोकरी :** IDFC, First Bank **वा. प्रा. :** 5 लाख
**अपेक्षा :** मनमिळावू, कोणतीही पोटशाखा, सांगली येथे राहणारी
**पत्ता : श्री. अजित शामराव गाडगीळ** गावभाग, सांगली.
मोबा. 9552520494, 9011036426

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गार्ग्य | मेष | कृतिका | प्रथम | अंत्य | राक्षस |

# गोष्ट आईच्या दुधाची...! वरदा अंदुरकर बनल्या आधुनिक दूधमाता



डॉ. सविता चौगुले-बिराजदार यांचेसमवेत सौ. वरदा अंदुरकर

नवजात बाळांसाठी अमृत संबोधल्या जाणाऱ्या आईच्या दुधाचे महत्व ओळखून आपल्या बाळाप्रमाणेच अनेक नवजात बाळांसाठी दूधआई बनत सामाजिक भान जोपासण्याचे काम कोल्हापूरच्या वरदा शुभम अंदुरकर यांनी केले आहे. त्यांच्या या कृतीमुळे १८ पेक्षा जास्त गरजू बालकांना आईचे दूध मिळाले तसेच रक्तदान, अवयवदाना इतकेच मातेच्या दूध दानाचे महत्त्वही समाजापर्यंत पोहोचले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे खऱ्या अर्थाने त्यांनी आईपणाचे कर्तव्य पार पाडल्याचे बोलले जात आहे.

अत्यंत सुसंस्कृत आणि पुढारलेल्या कुटुंबातून आलेल्या वरदा शुभम अंदुरकर-भिडे या स्वतः सी.एस. आहेत. लग्नापूर्वीपासूनच त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. त्यातूनच त्यांनी शिक्षण पूर्ण झाल्यावर मिळालेल्या नोकरीचा फायदा समाजातील गरजू संस्था, संघटनांना करण्याचे ठरवले. त्यामुळे नोकरीतून मिळालेल्या पगारातून त्यांनी सातत्याने पैसा सामाजिक कार्याला खर्च केला. लग्नानंतरही कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत सासरच्या व्यवसायाला हातभार लावतच आपले कार्य लहान-मोठ्या प्रमाणावर चालू ठेवले. डिसेंबर २०२५ मध्ये वरदा आणि शुभम यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. कोल्हापुरातील श्रेयस हॉस्पिटल येथे त्यांची डॉ. पद्मारेखा जिरगे यांच्या देखरेखी खाली यशस्वीपणे प्रसुती झाली. अगदी दोन-तीन दिवसातच त्यांना डिस्चार्ज मिळून त्या माहेरी आल्या. प्रसूती नंतर पहिल्या महिन्यात आपल्या बाळाची दुधाची गरज पूर्ण झाल्यानंतर उर्वरित दूध वाया जात असे. पण घरी असताना आईचे दूध म्हणजे लिक्विड गोल्ड असल्याचे त्यांच्या वाचनात आले. इंटरनेट तसेच डॉक्टरांकडून परिपूर्ण माहिती घेतल्यावर त्यांनी आपले दूध पूर्णपणे मोफत दान करण्याचा निर्णय घेतला. शहरातील साईस्पर्श हॉस्पिटल येथे आईच्या दुधाची मिल्क बँक उपलब्ध असल्याचे कळताच त्यांनी हॉस्पिटलशी संपर्कही साधला. स्टोरेज बॅग मध्ये २५० मिली प्रमाणे दूध त्यांनी फ्रिजरमध्ये योग्य ती काळजी घेऊन साठवण्यास सुरुवात केली. साईस्पर्शच्या टीमकडून ॲम्बुलन्स द्वारे वरदा यांच्या माहेरी दर २ ते ३ दिवसांनी दूध संकलित केले जात होते. काही महिन्यातच तब्बल १६ लिटर दूध त्यांनी मिल्क बँक मध्ये दान केले. या दुधामुळे १८ पेक्षा जास्त नवजात बालकांना त्याचा फायदा झाला. मुख्य म्हणजे अंदूरकर आणि भिडे कुटुंबीयांनी वरदा यांच्या निर्णयाचे कौतुक करतच त्यांना भक्कम पाठिंबा दिला. आईच्या दुधाचे दानाची परंपरा आपल्या इतिहासात पण नोंदवण्यात आली आहे. भगवान श्रीकृष्णाला सांभाळणाऱ्या दूध पाजणाऱ्या यशोदा मातेला तर त्यांची खरी आई देवकीइतकेच महत्त्व आहे, तर स्वराज्याचे पहिले युवराज छत्रपती शंभुराजे यांच्या दूध माता असलेल्या धाराऊ गाडे यांनाही स्वराज्यात मोठा मान मिळाला. आता आधुनिक काळातही या दुधाचे महत्त्व विचारात घेता वरदा यांनी विना मोबदला केलेले हे कार्य तितकेच महनीय म्हणावे लागणार आहे !



## लोकजागृती आवश्यक

आईचे दूध डोनेट केल्याने आपल्या बाळाला कमी पडेल? आरोग्याचे प्रश्न निर्माण होतील, अशा प्रकारचे गैरसमज आजही समाजात आहेत. पण वैज्ञानिक दृष्ट्या अशा कोणत्याही गोष्टी होत नाहीत. या उलट शासकीय दवाखान्यांमध्ये विशेष मिल्क बँक उभारणी राज्यभर सुरू आहे. तसेच काही खाजगी संस्थांमार्फत ही स्वतःहून दूध संकलन केले जात आहे. त्यामुळे मातेला घरबसल्याही दूध देणे शक्य आहे. **वरदा अंदुरकर- भिडे**

## दूध दानाचे महत्त्व

ज्याप्रमाणे माणसाचे रक्त कोणत्याही प्रयोगशाळेमध्ये तयार होऊ शकत नाही त्याप्रमाणे आईचे दूध सुद्धा कृत्रिमरित्या तयार करता येत नाही. काही कारणाने लहान बाळाला आईचे दूध मिळाले नाही तर अशा दूध मातांच्या माध्यमातूनच हे दूध उपलब्ध होऊ शकते . नवजात शिशु अतिदक्षता विभागामध्ये दाखल झालेल्या विशेषतः कमी वजनाच्या बाळाला आईचे दूध मिळणे अत्यंत आवश्यक असते त्यामुळे जंतुसंसर्गाचा धोका कमी होतो व आतड्याची सुरक्षितता शाबूत राहते. तसेच बाळाची वाढ होण्याकरिता उपयोग होतो. सध्याच्या आधुनिक जमान्यामध्ये योग्य ती काळजी घेऊन शुद्ध व निर्जंतुक केलेले दूध मिल्क बँकेच्या माध्यमातून काही हॉस्पिटल्सने उपलब्ध केले आहे. वरदा अंदुरकर/ भिडे यांनी आपले दूध मिल्क बँकेला दान करून खऱ्या अर्थाने दुधदानाचे महत्त्व समाजापुढे मांडले आहे.

**(डॉ. सविता चौगुले -बिराजदार, साईस्पर्श हॉस्पिटल , कोल्हापूर)**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.